रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

सं. 1] नई दिल्ली, अप्रैल 21-27, 2016/1-7 वैशाख (शक) 1938 [खंड 17

No. 1] NEW DELHI, APRIL 21-27, 2016/1-7 VAISAKHA (SAKA) 1938 [Vol. 17

अं. १] नवी दिल्ली, एप्रिल २१-२७, २०१६/१-७ वैशाख (शके) १९३८ [खंड १७

स्वंतत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, अप्रैल 21-27, 2016/1-7 वैशाख (शक) 1938

(1) दि सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड एक्ट, 2008, (2) दि राईट ऑफ चिल्ड्रेन टू फ्री ॲन्ड कम्पलसरी एज्युकेशन एक्ट, 2009, (3) दि इंडियन फॉरेस्ट एक्ट, 1927, (4) दि कॅरिज बाय रोड एक्ट, 2007 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, APRIL 21-27, 2016/1-7 VAISAKHA (SAKA) 1938

The Translation in Marathi of (1) The Science and Engineering Research Board Act, 2008, (2) The Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, (3) The Indian Forest Act, 1927, (4) The Carriage by Road Act, 2007 are hereby published under

the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

**विधि और न्याय मंत्रालय**

(विधायी विभाग)

नवी दिल्ली, एप्रिल २१-२७, २०१६/१-७ वैशाख (शके) १९३८

पुढील अधिनियमांचे म्हणजे (१) दि सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड अॅक्ट, २००८, (२) दि राईट ऑफ चिल्ड्रेन टू फ्री अॅन्ड कम्पलसरी एज्युकेशन अॅक्ट, २००९, (३) दि इंडियन फॉरेस्ट अॅक्ट, १९२७, (४) दि कॅरिज बाय रोड अॅक्ट, २००७ या अधिनियमांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रसिद्ध करण्यात येत असून प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २, खंड (क) अन्वये हा अनुवाद त्या अधिनियमाचे प्राधिकृत पाठ आहेत असे समजले जाईल.

निर्देशसूची

INDEX


| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन मंडळ अधिनियम, २००८<br>The Science and Engineering Research Board Act, 2008 | ३ |
| २ | बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९<br>The Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 | १० |
| ३ | भारतीय वन अधिनियम, १९२७<br>The Indian Forest Act, 1927 | २४ |
| ४ | रस्ते वाहतूक अधिनियम, २००७<br>The Carriage by Road Act, 2007 | ४५ |

# भारतीय वन अधिनियम, १९२७

## [1](सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६)

( १४ ऑक्टोबर २०१५ रोजी यथाविद्यमान)

[२१ सप्टेंबर, १९२७]

**वने, वनोत्पादनाची वाहतूक आणि इमारती लाकूड व अन्य वनोत्पादन यांवर आकारावयाचे शुल्क यासंबंधीचा कायदा एकत्रित करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** वने, वनोत्पादनाची वाहतूक आणि इमारती लाकूड व अन्य वनोत्पादन यांवर आकारावयाच्या शुल्कासंबंधीचा कायदा एकत्रित करणे समयोचित आहे. त्याअर्थी, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास " भारतीय वन अधिनियम, १९२७ " असे म्हणावे. संक्षिप्त नाव व विस्तार.

[2][(२) या अधिनियमाचा विस्तार १ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी " **भाग ख** " राज्यामध्ये समाविष्ट असलेली राज्यक्षेत्रे खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) हा अधिनियम, १ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी बिहार, मुंबई, कूर्ग, दिल्ली, मध्यप्रदेश, ओरिसा, पंजाब, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये जी समाविष्ट होती त्या राज्यक्षेत्रांना लागू होतो, परंतु, कोणत्याही राज्याचे शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे हा अधिनियम संपूर्ण राज्यात किंवा राज्याच्या ज्या भागावर या अधिनियमाचा विस्तार आहे, आणि जेथे तो अंमलात नाही अशा कोणत्याही विनिर्दिष्ट भागात [3]अंमलात आणू शकेल]

**२.** या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— निर्वचन खंड.

(१) " गुरेढोरे " यात हत्ती, उंट, म्हशी, घोडे, घोड्या, खच्ची केलेले घोडे, तट्टे, शिंगरे, शिंग्या, खेचरे, गाढवे, डुकरे, एडके, मेंढ्या, बकऱ्या, कोकरे, बोकड आणि करडे यांचा समावेश होतो ;

(२) " वन अधिकारी " याचा अर्थ, [4]* * * राज्य शासन किंवा [4]* * * राज्य शासनाकडून यासंबंधात अधिकार प्रदान करण्यात आलेला कोणताही अधिकारी या अधिनियमाची सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही प्रयोजने पार पाडण्यासाठी किंवा या अधिनियमानुसार किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमानुसार वन अधिकाऱ्याने करणे आवश्यक असलेली कोणतीही गोष्ट करण्यासाठी नियुक्त करू शकेल अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

---

१. हा अधिनियम,—
(१) मध्य प्रदेशलां लागू असताना, त्यामध्ये मध्य प्रदेश अधिनियम, १९५० चा २६ आणि १९५४ चा २० यांद्वारे सुधारणा करण्यात आली ;
(२) उत्तर प्रदेशला लागू असताना, त्यामध्ये उत्तरप्रदेश अधिनियम, १९५१ चा १८, १९५६ चा ५, १९६० चा २१, १९७३ चा ११ आणि १९७६ चा १३ यांद्वारे सुधारणा करण्यात आली ;
(३) ओरिसाला लागू असताना, त्यामध्ये ओरिसा अधिनियम, १९५२ चा २५, १९५४ चा ११, १९५९ चा २७ आणि १९७२ चा १४ यांद्वारे सुधारणा करण्यात आली ;
(४) पश्चिम बंगालला लागू असताना, त्यामध्ये बंगाल अधिनियम, १९४५ चा ११ याच्या कलम ६३, पश्चिम बंगाल अधिनियम, १९४८ चा १४ आणि १९७५ चा १४ यांद्वारे सुधारणा करण्यात आली ;
(५) पूर्व पंजाबला लागू असताना, त्यामध्ये पूर्व पंजाब अधिनियम, १९४८ चा ७ याद्वारे सुधारणा करण्यात आली ;
(६) हरियाणा लागू असताना, त्यामध्ये हरियाणा अधिनियम, १९७३ चा १२ आणि १९७३ चा ३१ याद्वारे सुधारणा करण्यात आली ;
(७) महाराष्ट्राला लागू असताना, त्यामध्ये महाराष्ट्र अधिनियम, १९६१ चा ६ आणि १९६८ चा २७ यांद्वारे सुधारणा करण्यात आली ;
(८) गुजरातला लागू असताना, त्यामध्ये गुजरात अधिनियम, १९७३ चा १४ याद्वारे सुधारणा करण्यात आली ;
(९) म्हैसूरच्या विविक्षित भागांना लागू असताना, त्यामध्ये म्हैसूर अधिनियम, १९५८ चा १० यांद्वारे सुधारणा करण्यात आली ;

२. विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६ द्वारे मूळ पोटकलमांऐवजी पोटकलमे (२) आणि (३) दाखल करण्यात आली.

३. हा अधिनियम, खोंडमाळ विधि विनियम, १९३६ (१९३६ चा ४), कलम ३ व अनुसूची यांद्वारे खोंडमाळ जिल्ह्यात, आणि आंगुल विधि विनियम, १९३६ (१९३६ चा ५), कलम ३ व अनुसूची यांद्वारे आंगुल जिल्ह्यात अंमलात आल्याचे घोषित करण्यात आले. हा अधिनियम,—
(१) वऱ्हाडला (अंशतः) लागू असताना, वऱ्हाड विधि अधिनियम, १९४१ (१९४१ चा १) द्वारे त्याचा विस्तार करण्यात आला ;
(२) कूर्ग प्रांतास लागू असताना, त्याचा विस्तार करण्यात आला. पहा-कूर्ग **राजपत्र**, १९३०, भाग एक, इं. पृ.९४ ;
(३) दिल्ली प्रांतांस लागू असताना, त्याचा विस्तार करण्यात आला. पहा-भारताचे **राजपत्र**, १९३३-भाग दोन ए, इं.पृ. २९३ ;
(४) संपूर्ण मध्य प्रदेशाला लागु असताना, १९५८ चा मध्य प्रदेश अधिनियम, २३ द्वारे (अधिसूचित केला तेव्हा) त्याचा विस्तार करण्यात आला.
(५) दादरा व नगर हवेलीला लागू असताना, १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूची एक यांद्वारे त्याचा विस्तार करण्यात आला (१ जुलै १९६५ रोजी व तेव्हापासून).
(६) पाँडेचेरिला लागू असताना, १९६३ चा विनियम ७, कलम ३ व अनुसूची एक अन्वये दिनांक १-१०-१९६३ रोजी त्याचा विस्तार करण्यात आला.
(७) गोवा, दमण व दीव ला लागू असताना, १९६३ चा विनियम ११, कलम ३ व अनुसूची यांद्वारे त्याचा विस्तार करण्यात आला ; आणि
(८) संपूर्ण लक्षद्वीप संघ राज्यक्षेत्रास लागू असताना, १९६५ चा विनियम ८, कलम ३ व अनुसूची यांद्वारे त्याचा विस्तार करण्यात आला (१-१०-१९६७ रोजी व तेव्हापासून).
हा अधिनियम, बेल्लारी जिल्ह्यास लागू असतना, म्हैसूर अधिनियम, १९५५ चा १४ याद्वारे निरसित करण्यात आला

४. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, ...

(३) "वन अपराध" याचा अर्थ, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमान्वये दंडनीय अपराध, असा आहे ;

(४) "वनोत्पादन" यात पुढील गोष्टींचा समावेश आहे :—

(क) पुढील गोष्टी-मग त्या जंगलात सापडलेल्या असोत अगर जंगलातून आणलेल्या असोत किंवा नसोत-त्या म्हणजे,—

इमारती लाकूड, लोणारी कोळसा, रबर काथ, लाकडाचे तेल, राळ, नैसर्गिक वॉर्निश, साली, लाख, मोहाची फुले, मोहाच्या बिया [1][,कुठ] आणि हिरडा ; आणि

(ख) पुढील गोष्टी जंगलात सापडतील तेव्हा किंवा जंगलातून आणल्या जातील तेव्हा-त्या म्हणजे-

(एक) वृक्ष आणि पाने, फुले व फळे आणि यापूर्वी नमूद न केलेले झाडांचे अन्य सर्व भाग किंवा तज्जन्य उत्पादन ;

(दोन) ज्यांची झाडे झालेली नाहीत अशी रोपटी (गवत, वेली, वेरु आणि शेवाळ यांसह) आणि तशा रोपट्यांचे सर्व भाग आणि तज्जन्य उत्पादन ;

(तीन) वन्य प्राणी आणि कातडी, सुळे, शिंगे, हाडे, रेशीम, कोकुन्स, मध व मेण आणि प्राण्यांचे अन्य सर्व अवयव किंवा प्राणिजन्य उत्पादन ; आणि

(चार) कुजलेल्या वनस्पतींचे– झाडांचे सर्पण (Peat), भूपृष्ठावरील माती, खडक आणि खनिजद्रव्ये (चुनखडी, जांभा दगड, खनिज तेले आणि खाणीपासून किंवा दगड खाणीपासून मिळणारी सर्व उत्पादने यांसह)

[2][(४-क) " मालक " या संज्ञेत, पाल्याधिकरणाच्या अधीक्षणाखालील किंवा अखत्याराखालील मालमत्तेच्या संबंधात अशा पाल्याधिकरणाचा समावेश होतो ;]

(५) " नदी " या संज्ञेत, कोणताही ओढा, कालवा, खाडी किंवा अन्य नैसर्गिक किंवा कृत्रिम जलमार्ग यांचा समावेश होतो ;

(६) " इमारती लाकूड " या संज्ञेत, पडलेली किंवा पाडण्यात आलेली झाडे आणि सर्व प्रकारचे लाकूड- मग ते नुसते कापलेले असो अथवा कोणत्याही प्रयोजनार्थ त्याला आकार दिलेला असो किंवा ते पोखरलेले असो वा नसो - याचा समावेश होतो ; आणि

(७) " झाड " या संज्ञेत, ताड, बांबू, खोड, खुरटी झाडे आणि वेत यांचा समावेश होतो.

## प्रकरण दोन
## राखीव वने

वने राखून ठेवण्याचा अधिकार.

३. राज्य शासन, जी शासनाची मालमत्ता आहे किंवा जिच्याबाबत शासनाला मालकी स्वरूपाचे हक्क आहेत, किंवा जिच्यापासून मिळणाऱ्या संपूर्ण वनोत्पादनावर किंवा त्यापैकी कोणत्याही भागावर शासनाचा हक्क आहे अशी कोणतीही वन जमीन, किंवा पडीत जमीन यात यानंतर तरतूद केलेल्या रीतीने राखीव वन म्हणून ठेवू शकेल.

राज्य शासनाकडून अधिसूचना.

४. (१) जेव्हा एखादी जमीन राखीव वन म्हणून ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असेल तेव्हा, राज्य शासन,—

(क) अशी जमीन राखीव वन म्हणून ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे असे घोषित करणारी ;

(ख) अशा जमिनीचा ठावठिकाणा आणि सीमा शक्य होईल तितपत काटेकोरपणे विनिर्दिष्ट करणारी ; आणि

(ग) अशा सीमांच्या आतील कोणत्याही जमिनीमध्ये, किंवा तिच्यावर अथवा वनोत्पादनामध्ये किंवा त्यावर एखाद्या व्यक्तीचे जे कोणतेही हक्क असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल अशा हक्कांची चौकशी करण्याकरिता आणि त्यांचे अस्तित्व, स्वरूप किंवा त्यांची व्याप्ती निश्चित करण्याकरिता आणि या प्रकरणात तरतूद केल्याप्रमाणे ह्याचा परामर्श घेण्याकरिता एखाद्या अधिकाऱ्याची (ज्याला यात यापुढे " वन जमाबंदी अधिकारी " म्हणून संबोधण्यात आले आहे) नियुक्ती करणारी,

अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करील.

---

१. सन १९३० चा अधिनियम २६ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९३३ चा अधिनियम ३ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**स्पष्टीकरण.**—खंड (ख) च्या प्रयोजनार्थ, रस्ते, नद्या, सुळके किंवा अन्य सुपरिचित व सहज ओळखू येतील अशा हद्दींच्या साहाय्याने वन सीमांचे वर्णन केल्यास पुरेसे होईल.

(२) पोटकलम (१) च्या खंड (ग) अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी हा, वन जमाबंदी अधिकाऱ्याचे पद खेरीजकरून अन्य कोणतेही वनविषयक अधिकारपद धारण न करणारा असा असेल.

(३) या अधिनियमान्वये, वन जमाबंदी अधिकाऱ्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी जास्तीत जास्त तीनपर्यंत कितीही अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यास या कलमातील कोणत्याही गोष्टींमुळे राज्य शासनाला प्रतिबंध होणार नाही आणि त्याच्यापैकी जास्तीत जास्त एक व्यक्ती पूर्वोक्त खेरीजकरून अन्य कोणतेही वनविषयक अधिकारपद धारण करणारी असेल.

**वन हक्क उपार्जित होण्यास रोध.**

५. कलम ४ अन्वये अधिसूचना काढण्यात आल्यानंतर अशा अधिसूचनेत समाविष्ट असलेल्या जमिनीत किंवा तीवर उत्तराधिकाराशिवाय अथवा शासनाकडून किंवा शासनाच्या वतीने शासनाने अगर अशी अधिसूचना काढण्याच्या वेळी ज्या व्यक्तीकडे असा अधिकार निहित होता अशा एखाद्या व्यक्तीने किंवा त्यांच्या वतीने इनामपत्र किंवा करारपत्र केल्याशिवाय किंवा ते अंमलात आणल्याशिवाय अन्यथा अधिकार संपादन करता येणार नाही. आणि यासंबंधात राज्य शासनाकडून करण्यात येतील अशा नियमांना अनुसरून असेल ते खेरीजकरून एरव्ही, अशा जमिनीमध्ये लागवडीसाठी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनास्तव नव्याने कोणतीही जंगलतोड करता येणार नाही.

**वन जमाबंदी अधिकाऱ्यांने उद्घोषणा करणे.**

६. कलम ४ अन्वये अधिसूचना काढण्यात आली असेल तेव्हा, वन जमाबंदी अधिकारी तीमध्ये अंतर्भूत असलेल्या जमिनीच्या आसपासच्या भागातील प्रत्येक नगरात व खेड्यात तेथील स्थानिक लोकभाषेत एक उद्घोषणा प्रसिद्ध करुन तीद्वारे,—

(क) नियोजित वनाचा ठावठिकाणा आणि सीमा, जास्तीत जास्त शक्य होईल तितक्या काटेकोरपणे विनिर्दिष्ट करील ;

(ख) असे वन राखून ठेवल्यामुळे यात यानंतर तरतूद करण्यात आल्याप्रमाणे नंतर कोणते परिणाम घडून येतील ते स्पष्ट करील; आणि

(ग) अशा उद्घोषणेच्या दिनांकापासून तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल इतका कालावधी निश्चित करील आणि कलमे ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेला कोणताही अधिकार सांगण्याऱ्या प्रत्येक व्यक्तीने, अशा कालावधीच्या आत, एकतर अशा अधिकाराचे स्वरूप आणि त्याच्या संबंधाशी मागणी केलेल्या नुकसानभरपाईची (काही असल्यास) रक्कम आणि तपशील विनिर्दिष्ट करणारी लेखी नोटीस, वन जमाबंदी अधिकाऱ्याला सादर करावी किंवा आपणांसमोर उपस्थित होऊन तिने निवेदन करावे असे फर्मावील.

**वन जमाबंदी अधिकाऱ्याकडून करण्यात येणारी चौकशी.**

७. वन जमाबंदी अधिकारी कलम ६ अन्वये केलेल्या सर्व निवेदनांची लेखी नोंद घेईल आणि त्या कलमान्वये रीतसर दाखल केलेल्या सर्व हक्कमागण्यांसंबंधी आणि कलम ४ किंवा कलम ५ मध्ये नमूद केलेले परंतु कलम ६ अन्वये मागणी न केलेले कोणतेही हक्क अस्तित्वात आहेत किंवा कसे यासंबंधी शासकीय अभिलेखावरून आणि त्यासंबंधात माहिती असण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या साक्षीपुराव्यावरून खातरजमा करता येण्यासारखी असेल तेवढ्या मर्यादेपर्यंत एखाद्या सोयीच्या ठिकाणी चौकशी करील.

**वन जमाबंदी अधिकाऱ्यांचे अधिकार.**

८. अशा चौकशीच्या प्रयोजनार्थ वन जमाबंदी अधिकारी, पुढील अधिकार वापरू शकेल. ते म्हणजे :-

(क) कोणत्याही जमिनीवर, स्वत: किंवा या प्रयोजनार्थ त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांकरवी प्रवेश करण्याचा, आणि तिचे सर्वेक्षण व सीमांकन करण्याचा आणि तिचा नकाशा बनविण्याचा अधिकार ;

(ख) दाव्यांची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाला असलेले अधिकार ;

**हक्काचे विलोपन.**

९. ज्याच्या संबंधात, कलम ६ अन्वये कोणतीही हक्कमागणी दाखल करण्यात आलेली नाही आणि कलम ७ अन्वये चौकशी करून ज्यांच्या आस्तित्व संबंधात कोणतीही माहिती मिळलेली नाही. असे हक्क विलोपित होतील– मात्र कलम २० अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येण्यापूर्वी अशी, हक्कमागणी करणाऱ्या व्यक्तीने, कलम ६ अन्वये निश्चित केलेल्या कालावधीच्या आत हक्कमागणी दाखल न करण्याचे सबळ कारण असल्याबद्दल वन जमाबंदी अधिकाऱ्याची खात्री करून दिली असेल तर गोष्ट अलाहिदा.

**स्थानपालट शेती पद्धतीसंबंधीच्या हक्कमागण्या कशा प्रकारे हाताळण्यात याव्यात यासंबंधीची कार्यपद्धती.**

१० (१) स्थानपालट शेती पद्धतीसंबंधीच्या हक्कमागणीच्या बाबतीत वन जमाबंदी अधिकारी, त्या हक्कमागणीची आणि स्थानिक नियमान्वये किंवा आदेशान्वये या स्थानपालट शेती-पद्धतीला मान्यता देण्यात आली आहे, किंवा ती नियमित करण्यात आली आहे त्या कोणत्याही नियमाचा किंवा आदेशाचा तपशील देणारे निवेदन अभिलिखित करील आणि ते निवेदन व तसेच त्या स्थापनपालट शेती-पद्धतीला संपूर्णत: किंवा अंशत: परवानगी देण्यात यावी किंवा प्रतिबंध करण्यात यावा किंवा कसे यासंबंधीचा आपला अभिप्राय राज्य शासनाला सादर करील.

(२) असे निवेदन आणि असे अभिप्राय मिळाल्यानंतर, राज्य शासन, अशा स्थानपालट शेती-पद्धतीला संपूर्णतः किंवा अंशतः परवानगी देणारा किंवा प्रतिबंध करणारा आदेश काढील.

(३) अशा पद्धतीला संपूर्णतः किंवा अंशतः परवानगी देण्यात आली तर, वन जमाबंदी अधिकारी, या स्थानपालट शेती-पद्धतीचा अवलंब करण्यासाठी पुढीलप्रकारे, म्हणजेच :—

(क) ज्यायोगे हक्कमागणीदारांच्या प्रयोजनांसाठी पुरेशी व सुयोग्य प्रकारची आणि सोयीच्या ठिकाणी असलेली जमीन वगळली जाईल अशा प्रकारे, जमाबंदी अधीन असलेल्या जमिनीच्या सीमांमध्ये फेरफार करून, अथवा

(ख) जमाबंदी अधीन असलेल्या जमिनीच्या काही भागांचे स्वतंत्र सीमांकन करण्याची व्यवस्था करून आणि तो विहित करील अशा शर्तींवर हक्कमागणीदाराला अशा जमिनीमध्ये स्थानपालट शेती करण्याची परवानगी देऊन,

व्यवस्था करील.

(४) पोट-कलम (३) खाली करण्यात आलेली सर्व व्यवस्था ही, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीच्या अधीन असेल,

(५) स्थानपालट शेती-पद्धती ही, सर्व बाबतीत एक विशेष हक्क म्हणून समजण्यात येईल. मात्र, राज्य शासनाला त्यावर नियंत्रण घालता येईल, तो मर्यादित करता येईल किंवा तो नष्ट करता येईल.

**ज्या जमिनीवर हक्क सांगण्यात आला आहे ती जमीन संपादन करण्याचा अधिकार.**

**११.** (१) जमिनीमधून जाण्यायेण्याचा अथवा गुरे चारण्याचा हक्क अथवा वनोत्पादन किंवा जलप्रवाह याबाबतचा हक्क खेरीजकरून, कोणत्याही जमिनीमधील किंवा जमिनीवरील हक्काच्या बाबतीत, वन जमाबंदी अधिकारी, तो हक्क संपूर्णतः किंवा अंशतः मान्य करणारा किंवा नाकारणारा आदेश काढील.

(२) अशी हक्कमागणी जर संपूर्णतः किंवा अंशतः मान्य करण्यात आली तर, वन जमाबंदी अधिकारी, एकतर—

(एक) अशी जमीन नियोजित वनाच्या हद्दींमधून वगळील ; किंवा

(दोन) अशा जमिनीच्या मालकाने हक्क प्रत्यर्पित करावेत यासाठी त्याच्याबरोबर करार करील ; किंवा

(तीन) " भूमि संपादन अधिनियम, १८९४ " (१८९४ चा १) याद्वारे तरतूद केलेल्या पद्धतीने अशी जमीन संपादन करण्याची कार्यवाही करील.

(३) अशी जमीन संपादित करण्याच्या प्रयोजनार्थ,—

(क) वन जमाबंदी अधिकारी हा, " भूमि संपादन अधिनियम, १८९४ " (१८९४ चा १) याअन्वये कार्यवाही करणारा जिल्हाधिकारी म्हणून समजण्यात येईल.

(ख) हक्कमागणीदार म्हणजे, त्या अधिनियमाच्या कलम ९ अन्वये देण्यात आलेल्या नोटिशीला अनुसरून एक हितसंबंधित म्हणून त्याच्यासमोर उपस्थित होणारी व्यक्ती असल्याचे समजण्यात येईल ;

(ग) त्या अधिनियमाच्या पूर्वोक्त कलमांच्या तरतुदींचे अनुपालन करण्यात आले आहे असे मानण्यात येईल ; आणि

(घ) जिल्हाधिकारी, हक्कमागणीदाराच्या संमतीने अथवा न्यायालय, दोन्ही पक्षांच्या संमतीने, जमिनीच्या स्वरुपात किंवा अंशतः जमिनीच्या आणि अंशतः पैशांच्या स्वरुपात नुकसानभरपाई मिळवून देईल.

**गुरे चारणे आणि वनोत्पादन यासंबंधीच्या हक्कमागणीवरील आदेश.**

**१२.** गुरे चारणे किंवा वनोत्पादन यासंबंधीच्या हक्कमागणीच्या बाबतीत, वन जमाबंदी अधिकारी, हा अशी हक्कमागणी संपूर्णतः किंवा अंशतः मान्य करणारा किंवा नाकारणारा आदेश मंजूर करील.

**वन जमाबंदी अधिकाऱ्याने करावयाची नोंद.**

**१३.** वन जमाबंदी अधिकारी, कलम १२ अन्वये कोणताही आदेश देताना, व्यवहार्य होईल तेथवर, पुढील गोष्टींची नोंद करील :—

(क) हक्कमागणी करणाऱ्या व्यक्तीचे नाव, वडिलांचे नाव, जात, राहण्याचे ठिकाण, व्यवसाय ; आणि

(ख) ज्यांच्या संबंधात अशी हक्कमागणी करण्यात आलेली आहे अशा सर्व शेतांची किंवा शेतांच्या गटांची (कोणतीही असल्यास) नावे, स्थिती व क्षेत्र आणि सर्व इमारतींची (कोणत्याही असल्यास) त्यांची नावे व ठिकाण.

**१४.** वन जमाबंदी अधिकाऱ्याने जर कलम १२ अन्वये कोणतीही हक्कमागणी संपूर्णत: किंवा अंशत: मान्य केली तर, तो हक्कमागणीदार वेळोवेळी किती गुरे अशा जंगलात चारण्यास हक्कदार आहे ती संख्या व त्यांचे वर्णन, कोणत्या हंगामात अशी गुरे चारण्यास मुभा देण्यात आली आहे ते आणि अशा जंगलातून तो वेळोवेळी किती इमारती लाकूड किंवा अन्य वनोत्पादन घेण्यास किंवा मिळण्यास प्राधिकृत झाला आहे ते प्रमाण आणि परिस्थितीनुसार आवश्यक असेल असा अन्य तपशील या गोष्टी विनिर्दिष्ट करून अशी मागणी कोणत्या मर्यादेपर्यंत मान्य करण्यात आली आहे तेही तो अधिकारी नमूद करील. मागितलेले हक्क वापरून मिळवलेले इमारती लाकूड किंवा अन्य वनोत्पादन याची विक्री करण्यात यावी किंवा त्यांचा विनिमय करण्यात यावा किंवा कसे हेही तो नमूद करील. वन जमाबंदी अधिकाऱ्याने हक्कमागणी मान्य केल्यास त्याबाबतीतील नोंद.

**१५.** (१) अशी नोंद केल्यानंतर वन जमाबंदी अधिकारी, आपल्या कार्यकुशलतेनुसार, आणि ज्यासंबंधी हक्कमागणी करण्यात आलेली आहे त्या राखीव वनाचे परिरक्षण होण्याच्या दृष्टीने यथायोग्य विचार करून, अशा प्रकारचे आदेश मंजूर करील की, ज्यायोगे याप्रमाणे मान्य केलेल्या हक्कांचा वापर चालू राहण्याची खात्री मिळेल. मान्य केलेल्या हक्कांचा वापर.

(२) या प्रयोजनार्थ, वन जमाबंदी अधिकारी,—

(क) अशा हक्कमागणीदारांसाठी पुरेशा आकाराचा आणि वाजवीरित्या सोईस्कर अशा स्थानिक क्षेत्रांमधील जंगलाचा भूभाग आखून देऊ शकेल, आणि अशा प्रकारे मान्य केलेल्या मर्यादेपर्यंत गुरे चारण्याचा किंवा, यथास्थिति, वनोत्पादनाबाबतचा हक्क बहाल करणारा आदेश नमूद करू शकेल ; किंवा

(ख) हक्कमागणीदारांसाठी पुरेशा विस्ताराची आणि वाजवीरित्या सोईस्कर अशा स्थानिक क्षेत्रातील वनजमीन वगळली जाईल अशा प्रकारे नियोजित वनाच्या सीमांमध्ये फेरफार करू शकेल ; किंवा

(ग) अशा हक्कमागणीदारांचा गुरे चारण्याचा किंवा, यथास्थिति, वनोत्पादनाबाबतचा हक्क ज्या मर्यादेपर्यंत मंजूर करण्यात आला त्या मर्यादेपर्यंत आणि राज्य शासनाकडून यासंबंधात करण्यात येतील अशा नियमान्वये, अशा हंगामामध्ये नियोजित वनाच्या अशा भूभागांमध्ये चालू ठेवणारा आदेश नमूद करू शकेल.

**१६.** राखीव वनाची देखभाल करण्याची बाब यथायोग्यरीत्या विचारात घेता, वन जमाबंदी अधिकाऱ्याला जर असे वाटले की, उक्त हक्क ज्या मर्यादेपर्यंत मान्य करण्यात आले आहेत त्या मर्यादेपर्यंत त्यांचा वापर चालू राहण्याची शाश्वती मिळेल अशा प्रकारे कलम १५ अन्वये जमाबंदी करणे अशक्य आहे, तर राज्य शासन या संबंधात जे नियम करील अशा नियमांच्या अधीन राहून तो, अशा व्यक्तींना त्याऐवजी पैशाची एखादी रक्कम प्रदान करून, किंवा जमीन इनाम देऊन किंवा त्यास योग्य वाटेल अशा अन्य कोणत्याही पद्धतीने अशा हक्कांचे परिवर्तन करील. हक्कांचे परिवर्तन.

**१७.** या अधिनियमान्वये जिने हक्कमागणी केलेली असेल अशी कोणतीही व्यक्ती, अथवा यासंबंधात राज्य शासनाने ज्याला सर्वसाधारणपणे किंवा विशेषकरून अधिकार प्रदान केला आहे असा कोणताही वन अधिकारी किंवा अशी अन्य व्यक्ती, वन जमाबंदी अधिकाऱ्याने कलम ११, कलम १२, कलम १५ किंवा कलम १६ अन्वये अशा हक्कमागणीच्या संबंधात काढलेल्या आदेशाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, अशा आदेशाविरूद्ध, राज्य शासन, जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा निम्न दर्जा नसलेल्या महसूल विभागाच्या ज्या अधिकाऱ्यास अशा आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलांच्या सुनावणीसाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील, अशा अधिकाऱ्यापुढे अपील सादर करू शकेल ; कलम ११, कलम १२, कलम १५ किंवा कलम १६ अन्वये काढलेल्या आदेशाविरुद्ध अपील.

परंतु असे की, राज्य शासन, त्याने नियुक्त करावयाच्या तीन व्यक्ती मिळून एक न्यायालय (ज्याला यापुढे "वन न्यायालय" म्हणून संबोधण्यात आले आहे) स्थापन करू शकेल आणि असे वन न्यायालय अशा प्रकारे स्थापन करण्यात आले की, मग अशी सर्व अपिले त्या न्यायालयाकडे सादर करण्यात येतील.

**१८.** (१) कलम १७ खालील प्रत्येक अपील, लेखी विनंती अर्जाद्वारे करावे लागेल व ते वन जमाबंदी अधिकाऱ्याकडे सादर करता येईल, म्हणजे वन जमाबंदी अधिकारी, विनाविलंब तो अर्ज, सुनावणीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठवील. कलम १७ खालील अपील.

(२) जर हे अपील, कलम १७ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या एखाद्या अधिकाऱ्यासमोर करण्यात आले असेल तर, त्या अपिलाची सुनावणी जमीन-महसूलविषयक बाबींमधील अपिलांची सुनावणी करण्याकरिता त्या त्या वेळी विहित करण्यात आलेल्या पद्धतीने करण्यात येईल.

(३) हे अपील जर वन न्यायालयाकडे करण्यात आले असेल तर, वन न्यायालय, अपिलाच्या सुनावणीसाठी एखादा दिवस आणि नियोजित वनाच्या आसपासच्या भागातील एक सोयीची जागा निश्चित करून त्यासंबंधीची नोटीस संबंधित व्यक्तींना देईल, व तद्नुसार अशी अपिलाची सुनावणी करील.

(४) अशा अपिलावर, अशा अधिकाऱ्याने किंवा न्यायालयाने किंवा, यथास्थिति, अशा न्यायालयाच्या सदस्यांच्या बहुमताने संमत केलेला आदेश, केवळ राज्य शासनाने केलेल्या पुनरीक्षणास अधीन राहून, अंतिम असेल.

वकील. **१९.** या अधिनियमान्वये कोणतीही चौकशी चालू असताना, किंवा अपिलाच्या वेळी, राज्य शासन, त्याच्या वतीने किंवा या अधिनियमान्वये ज्या व्यक्तीने हक्कमागणी केली आहे अशी कोणतीही व्यक्ती तिच्या वतीने, वन जमाबंदी अधिकारी अथवा अपिलीय अधिकारी किंवा न्यायालय यांच्यासमोर हजर राहण्यासाठी, आपली बाजू मांडण्यासाठी आणि काम चालवण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला नियुक्त करू शकेल.

एखादे वन राखीव वन म्हणून घोषित करणारी अधिसूचना. **२०.** (१) पुढील घटना घडलेल्या असतील तेव्हा ; म्हणजे,—

(क) जेव्हा हक्कमागणी दाखल करण्याकरिता कलम ६ अन्वये निश्चित करण्यात आलेला कालावधी उलटून गेलेला असेल आणि त्या कलमान्वये किंवा कलम ९ अन्वये केलेल्या सर्व हक्कमागण्या, कोणत्याही असल्यास, वन जमाबंदी अधिकाऱ्याने निकालात काढलेल्या असतील तेव्हा ;

(ख) अशा कोणत्याही हक्कमागण्या केल्या असता, अशा हक्कमागण्यांवर संमत केलेल्या आदेशांविरूद्ध अपील करण्यासाठी कलम १७ द्वारे घालून दिलेली कालमर्यादा उलटून गेली असेल आणि अशा कालावधीत सादर केलेली सर्व अपिले (कोणतीही असल्यास) अपिलीय अधिकाऱ्याने किंवा न्यायालयाने निकालात काढलेली असतील तेव्हा ; आणि

(ग) नियोजित वनामध्ये समाविष्ट करण्यासाठी वन जमाबंदी अधिकाऱ्याने " भूमि संपादन अधिनियम, १८९४ " (१८९४ चा १) याच्या कलम ११ अन्वये ज्या जमिनी संपादित करण्याचे ठरवले आहे त्या सर्व जमिनी (कोणत्याही असल्यास), त्या अधिनियमाच्या कलम १६ अन्वये शासनाकडे निहित झालेल्या असतील तेव्हा ;

राज्य शासन, **राजपत्रात** एक अधिसूचना प्रसिद्ध करून तीद्वारे, राखीव म्हणून जे घोषित करावयाचे आहे त्या वनाच्या हद्दी, उभारलेल्या सीमा चिन्हांनुसार किंवा अन्यथा निश्चितपणे विनिर्दिष्ट करील व अधिसूचनेद्वारे निश्चित करण्यात येईल अशा दिनांकापासून ते राखीव म्हणून घोषित करील.

(२) अशा प्रकारे निश्चित करण्यात आलेल्या दिनांकापासून अशा वनाला राखीव वन म्हणून समजण्यात येईल.

अशा अधिसूचनेचा अनुवाद वनाच्या आसपासच्या भागात प्रसिद्ध करणे. **२१.** वन अधिकारी, अशा अधिसूचनेद्वारे निश्चित करण्यात आलेल्या दिनांकापूर्वी त्या अधिसूचनेचा स्थानिक लोकभाषेतील अनुवाद, त्या वनाच्या आसपासच्या प्रत्येक नगरामध्ये व खेड्यामध्ये प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

कलम १५ किंवा कलम १८ अन्वये करण्यात आलेली व्यवस्था बदलण्याचा अधिकार. **२२.** राज्य शासन, कलम २० अन्वये कोणतीही अधिसूचना प्रकाशित केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या आत, कलम १५ किंवा कलम १८ अन्वये केलेली कोणतीही व्यवस्था बदलू शकेल, आणि या प्रयोजनार्थ, कलम १५ किंवा कलम १८ अन्वये काढलेला कोणताही आदेश विखंडित करू शकेल किंवा त्यात फेरफार करू शकेल, आणि कलम १५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यवाहीपैकी कोणतीही एक कार्यवाही ही त्यांपैकी अन्य कोणत्याही कार्यवाहीच्या ऐवजी करण्यात यावी किंवा कलम १२ अन्वये मान्य केलेले हक्क, कलम १६ अन्वये परिवर्तित करण्यात यावेत, असा निदेश देऊ शकेल.

या ठिकाणी तरतूद करण्यात आली आहे ते खेरीजकरुन एरव्ही, राखीव वनावर कोणताही हक्क प्राप्त करता येणार नाही. **२३.** उत्तराधिकाराखेरीज, अथवा शासनाने किंवा शासनाच्या वतीने कलम २० अन्वये अधिसूचना काढली तेव्हा, ज्या व्यक्तीकडे असा हक्क निहित झाला होता अशा एखाद्या व्यक्तीच्या वतीने करून देण्यात आलेले इनामपत्र किंवा लेखी संविदा याखेरीज, राखीव वनामध्ये किंवा वनावर कोणत्याही प्रकारचा हक्क प्राप्त करता येणार नाही.

हक्क हे मंजुरीशिवाय अन्यसंक्रामित न करणे. **२४.** (१) कलम २३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १५, पोटकलम (२), खंड (ग) अन्वये चालू ठेवलेला कोणताही हक्क राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय इनामपत्र, विक्री, भाडेपट्टा, गहाण याद्वारे किंवा अन्य प्रकारे अन्यसंक्रामित करता येणार नाही :

परंतु असे की, असा कोणताही हक्क हा जेव्हा कोणत्याही जमिनीला किंवा घराला संलग्न असेल तेव्हा, तो अशा जमिनीबरोबर किंवा घराबरोबर विकता येईल किंवा अन्य प्रकारे अन्यसंक्रामित करता येईल.

(२) अशा कोणत्याही हक्काचा वापर करून मिळवलेले कोणतेही इमारती लाकूड किंवा अन्य वनोत्पादन हे कलम १४ अन्वये नमूद केलेल्या आदेशात जेवढी मर्यादा मान्य केली आहे तेवढी मर्यादा खेरीजकरून विकता येणार नाही किंवा त्याचा विनिमय करता येणार नाही.

राखीव वनातील रस्ते आणि जलमार्ग बंद करण्याचा अधिकार. **२५.** वन अधिकारी, राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाने या संबंधात रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने, राखीव वनातील कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी रस्ता किंवा जलमार्ग बंद करू शकेल—मात्र, याप्रमाणे बंद केलेल्या रस्त्याला किंवा जलमार्गाला पर्यायी असा जो रस्ता किंवा जलमार्ग राज्य शासनाला वाजवीपणे सोईस्कर वाटतो असा एखादा रस्ता किंवा जलमार्ग आधीपासूनच अस्तित्त्वात असला पाहिजे, किंवा वन अधिकाऱ्याने त्या ऐवजी अशा रस्त्याची किंवा मार्गाची सोय उपलब्ध केलेली असली पाहिजे किंवा तो बांधलेला असला पाहिजे.

२६. (१) जी कोणतीही व्यक्ती,—

अशा वनामध्ये मनाई करण्यात आलेल्या कृती.

(क) कलम ५ अन्वये मनाई करण्यात आलेली नव्याने कोणतीही जंगलतोड करील ;

(ख) राखीव वनाला आग लावील किंवा राज्य शासनाने याबाबत केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करून अशा वनाची सुरक्षितता धोक्यात येईल अशा रीतीने आग पेटवील किंवा आग पेटलेली राहू देईल ; किंवा जो राखीव वनात ;

(ग) या संबंधात वन अधिकारी अधिसूचित करील असे हंगाम खेरीजकरून एरव्ही, कोणताही जाळ करील, तो पेटता ठेवील किंवा घेऊन जाईल ;

(घ) अतिक्रमण करील किंवा गुराढोरांना चारील, किंवा त्यांना अतिक्रमण करू देईल ;

(ङ) कोणतेही झाड पाडताना किंवा कोणतेही इमारती लाकूड कापताना किंवा ओढून नेताना निष्काळजीपणाने कोणतेही नुकसान करील ;

(च) कोणतेही झाड पाडील, त्याच्या घेराला चीर पाडील, ते छाटील, त्याला खाप लावील किंवा ते जाळेल किंवा त्याची साल काढून टाकील, पाने तोडून टाकील किंवा अन्य प्रकारे त्याची नासधूस करील ;

(छ) दगड खोदून काढील, चुना किंवा लोणारी कोळसा जाळील, किंवा कोणतेही वनोत्पादन गोळा करील, त्यावर कोणतीही निर्मितिप्रक्रिया करील किंवा ते काढून टाकील ;

(ज) लागवडीसाठी किंवा अन्य प्रयोजनार्थ कोणत्याही जमिनीची नांगरट करील किंवा जंगलतोड करील ;

(झ) यासंबंधात राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करून शिकार करील, बंदूक चालवील, मासेमारी करील, पाणी विषमय करील किंवा सापळे लावील अथवा फास टाकील ; किंवा

(ञ) जेथे "हत्ती संरक्षण अधिनियम, १८७९" (१८७९ चा ६) अंमलात नाही, त्या कोणत्याही क्षेत्रात अशा प्रकारे करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करून हत्तींची हत्या करील किंवा त्यांना पकडील,

ती व्यक्ती, वनाचे नुकसान करण्याबद्दल, दोषसिद्धी करणारे न्यायालय निदेश देईल अशी नुकसानभरपाईची रक्कम देण्याव्यतिरिक्त, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(२) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे,—

(क) वन अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीने किंवा राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमाखाली केलेल्या कोणत्याही कृतीला, किंवा

(ख) कलम १५ चे पोट-कलम (२) याच्या खंड (ग) अन्वये चालू ठेवलेल्या अथवा कलम २३ अन्वये शासनाने किंवा शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या लेखी इनामपत्राद्वारे किंवा संविदेद्वारे निर्माण केलेल्या कोणत्याही हक्काच्या वापराला मनाई होते असे समजण्यात येणार नाही.

(३) जेव्हा जेव्हा राखीव वनामध्ये हे हेतुपुरस्सर आग लावली जाईल किंवा अक्षम्य हयगयीमुळे आग लागेल तेव्हा, राज्य शासन (या कलमान्वये कोणतीही शिक्षा देण्यात आलेली असली तरीही) त्याला योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत अशा वनात किंवा त्याच्या कोणत्याही भागात गुरे चारण्याचे किंवा वनोत्पादनावरील सर्व हक्क तहकूब ठेवण्यात यावेत असा निदेश देऊ शकेल.

२७. (१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे [१]* * * असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमान्वये राखीव म्हणून ठरवण्यात आलेले कोणतेही वन किंवा त्याचा कोणताही भाग, अशा अधिसूचनेत निश्चित करण्यात आलेल्या दिनांकापासून राखीव असण्याचे बंद होईल.

एखादे वन यापुढे राखीव वन म्हणून राहिलेले नाही असे घोषित करण्याचा अधिकार.

(२) अशा रीतीने निश्चित करण्यात आलेल्या दिनांकापासून असे वन किंवा त्याचा भाग हा, राखीव म्हणून असण्याचे बंद होईल ; मात्र, ते बंद झाल्यामुळे अशा वनातील नष्ट झालेले हक्क (कोणतेही असल्यास) पुनरुज्जीवित होणार नाहीत.

## प्रकरण तीन

## ग्राम-वनांसंबंधी

२८. (१) राज्य शासन, राखीव वन म्हणून ठेवण्यात आलेल्या कोणत्याही जमिनीचे किंवा जमिनीवरील शासनाचे हक्क कोणत्याही गावकीकडे अभिहस्तांकित करू शकेल, आणि असे अभिहस्तांकन रद्द करू शकेल. अशा प्रकारे अभिहस्तांकित करण्यात आलेल्या सर्व वनांना, ग्राम-वने म्हणून संबोधण्यात येईल.

ग्राम-वनांची निर्मिती.

१. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

(२) राज्य शासन, ग्राम-वनाच्या व्यवस्थापनाचे विनियमन करण्यासाठी नियम करू शकेल व या नियमामध्ये, असे कोणतेही अभिहस्तांकन करण्यात आलेल्या अशा गावकींना, कोणत्या शर्तीखाली इमारती लाकूड, किंवा इतर वनोत्पादन किंवा कुरणे यांसाठी तरतूद करता येईल त्या शर्ती आणि अशा वनांचे संरक्षण आणि त्यांची सुधारणा याबाबतची त्यांची कर्तव्ये या गोष्टी विहित केल्या असतील.

(३) राखीव वनसंबंधीच्या या अधिनियमातील सर्व तरतुदी ह्या (जेथवर त्या अशा प्रकारे करण्यात आलेल्या नियमांशी विसंगत नाहीत तेथवर) ग्राम-वनांना लागू होतील.

## प्रकरण चार

## संरक्षित वनांबाबत

संरक्षित वने.

**२९.** (१) जी कोणतीही वनजमीन किंवा पडीत जमीन राखीव वनात समाविष्ट नसेल, परंतु शासनाच्या मालकीची असेल किंवा जिच्यावर शासनाला मालकी स्वरूपाचे हक्क असतील अशा जमिनीला अथवा शासन ज्यास हक्कदार आहे असे संपूर्ण वनोत्पादन किंवा त्याचा कोणताही भाग यांना या प्रकरणाच्या तरतुदी लागू होतील असे राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे घोषित करू शकेल.

(२) अशा कोणत्याही अधिसूचनेमध्ये समाविष्ट झालेल्या वनजमिनीला आणि पडीत जमिनीला " संरक्षित वन " म्हणून संबोधण्यात येईल.

(३) अशा कोणत्याही अधिसूचनेत समाविष्ट असलेली वनजमीन किंवा पडीत जमीन यामध्ये किंवा त्यावर शासनाला व खाजगी व्यक्तींना असलेल्या हक्कांचे स्वरूप व त्यांची व्याप्ती यांबाबत, जमीन-मोजणीच्या किंवा जमाबंदीच्या वेळी किंवा राज्य शासनाला योग्य वाटेल अशा अन्य कोणत्याही पद्धतीने चौकशी करण्यात येऊन त्याची नोंद करण्यात आल्याखेरीज अशी अधिसूचना काढण्यात येणार नाही. अशी प्रत्येक नोंद ही, तद्विरुद्ध शाबीत होईपर्यंत बरोबर असल्याचे गृहित धरण्यात येईल :

परंतु असे की, कोणत्याही वनजमिनीबाबत किंवा पडीत जमिनीबाबत अशी चौकशी करणे व त्याबाबत नोंद करणे आवश्यक असले तरी त्यामध्ये इतका कालावपव्यय होईल की, त्यामुळे शासनाचे हक्क धोक्यात येतील असे राज्य शासनाला वाटले तर, राज्य शासन, अशा चौकशीचे किंवा नोंदीचे काम प्रलंबित असताना अशी जमीन संरक्षित वन म्हणून घोषित करू शकेल, मात्र त्यामुळे कोणत्याही व्यक्तीच्या किंवा गावकीच्या विद्यमान हक्काचा संकोच होता कामा नये किंवा त्यांच्यावर कोणताही बाधक परिणाम होता कामा नये.

वृक्ष, इत्यादी राखीव म्हणून ठरवणारी अधिसूचना काढण्याचा अधिकार.

**३०.** राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,—

(क) संरक्षित वनातील कोणतेही वृक्ष किंवा वृक्षवर्ग यांना अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या दिनांकापासून राखीव म्हणून घोषित करू शकेल ;

(ख) अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला असा वनाचा कोणताही भाग, राज्य शासनास योग्य वाटेल त्याप्रमाणे परंतु जास्तीत जास्त तीस वर्षे इतक्या कालावधीपर्यंत बंद म्हणून घोषित करू शकेल आणि अशा भागावर खाजगी व्यक्तीचे कोणतेही हक्क असल्यास ते हक्क अशा कालावधीपुरते तहकूब होतील, मात्र अशा वनाचा उर्वरित भाग हा अशा प्रकारे बंद करण्यात आलेल्या भागात तहकूब झालेल्या हक्काचा वापर करण्याच्या दृष्टीने पुरेसा व वाजवी मर्यादेपर्यंत सोईस्कर असला पाहिजे ; किंवा

(ग) अशा कोणत्याही वनामधून दगड खोदून काढणे, चुना किंवा लोणारी कोळसा जाळणे किंवा कोणतेही वनोत्पादन गोळा करणे किंवा त्यावर कोणतीही निर्मितीप्रक्रिया करणे किंवा ते काढून नेणे या गोष्टींना आणि शेतीसाठी किंवा बांधकामासाठी किंवा गुरांचे कळप राखण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी अशा वनातील कोणत्याही जमिनीची नांगरट करण्यास किंवा कसलीही जंगलतोड करण्यास पूर्वोक्तानुसार नियत केलेल्या दिनांकापासून मनाई करू शकेल.

आसपासच्या भागात अधिसूचनेचा अनुवाद प्रसिद्ध करणे.

**३१.** जिल्हाधिकारी, कलम ३० अन्वये काढण्यात आलेल्या प्रत्येक अधिसूचनेचा, स्थानिक लोकभाषेतील अनुवाद अधिसूचनेत समाविष्ट असलेल्या वनांच्या आसपासच्या प्रत्येक नगरात आणि खेड्यात एखाद्या ठळक जागी लावण्याची व्यवस्था करील.

संरक्षित वनांसाठी नियम करण्याचा अधिकार.

**३२.** राज्य शासन, पुढील बाबींचे विनियमन करण्यासाठी नियम करू शकेल, त्या बाबी म्हणजे :—

(क) संरक्षित वनातील झाडे आणि इमारती लाकूड यांची काटछाट करणे, ती कापणे, त्यांचे रुपांतर करणे किंवा ती संपूर्णपणे तोडून टाकणे आणि वनोत्पादन गोळा करणे, त्यापासून वस्तुनिर्मिती करणे किंवा ते तेथून हलवणे ;

(ख) संरक्षित वनांच्या सानिध्यातील नगरांमधील व खेड्यांमधील रहिवाशांना स्वतःच्या वापरासाठी झाडे, इमारती लाकूड किंवा अन्य वनोत्पादन घेता यावे म्हणून त्यांना लायसने देणे आणि अशा व्यक्तींनी अशी लायसने सादर करणे व परत करणे ;

(ग) व्यापाराच्या प्रयोजनार्थ, अशा वनांतील झाडे पाडणाऱ्या किंवा तेथून इमारती लाकूड किंवा अन्य वनोत्पादन घेऊन जाणाऱ्या व्यक्तींना लायसन देणे, आणि अशा व्यक्तींनी लायसने सादर करणे व परत करणे ;

(घ) खंड (ख) आणि (ग) मध्ये उल्लेखिलेल्या व्यक्तींनी, अशा झाडांची काटछाट करण्याच्या आणि असे इमारती लाकूड व अन्य वनोत्पादन घेऊन जाण्याच्या परवानगीसाठी काही पैसे द्यावयाचे असल्यास ती प्रदाने ;

(ङ) अशी झाडे, इमारती लाकूड आणि उत्पादन यांच्या संबंधात त्यांनी अन्य काही रकमा द्यावयाच्या असल्यास ह्या रकमा आणि अशी प्रदाने ज्या ठिकाणी करावयाची ती ठिकाणे ;

(च) अशा वनांतून बाहेर नेल्या जाणाऱ्या वनोत्पादनाची तपासणी करणे ;

(छ) अशा वनांत लागवडीसाठी किंवा अन्य प्रयोजनासाठी जमिनीची नांगरट करणे किंवा जंगलतोड करणे ;

(ज) अशा वनांत असलेल्या इमारती लाकडांचा आणि कलम ३० खालील राखीव वृक्षांचा आगीपासून बचाव करणे ;

(झ) अशा वनांतील गवत कापणे आणि गुरेढोरे चारणे ;

(ञ) अशा वनांमध्ये शिकार करणे, बंदूक चालवणे, मासेमारी करणे, पाणी विषमय करणे, सापळे लावणे किंवा फास टाकणे, आणि ज्या क्षेत्रांमध्ये " हत्ती संरक्षक अधिनियम, १८७९ " (१८७९ चा ६) अंमलात नाही त्या क्षेत्रातील अशा वनांमध्ये हत्तींची शिकार करणे किंवा त्यांना पकडणे ;

(ट) कलम ३० अन्वये वनांच्या कोणत्याही बंद केलेल्या भागाचे संरक्षण व देखभाल करणे ; आणि

(ठ) कलम २९ मध्ये निर्देशिलेले अधिकार वापरणे.

**कलम ३० खालील अधिसूचना किंवा कलम ३२ खालील नियम यांचे उल्लंघन करून करण्यात आलेल्या कृतींबद्दल शास्ती.**

**३३.** (१) जी कोणतीही व्यक्ती पुढीलपैकी कोणताही अपराध करील, म्हणजे—

(क) कलम ३० अन्वये राखीव असलेला कोणताही वृक्ष पाडील, त्याच्या घेराला चीर पाडील, छाटील, त्याला खाप लावील, तो जाळून टाकील, किंवा त्याची साल काढून टाकील किंवा पाने तोडून टाकील अथवा अन्य प्रकारे त्याची नासधूस करील ;

(ख) कलम ३० अन्वये केलेली कोणतीही मनाई उल्लंघून, कोणतेही दगड खोदून काढील किंवा चुना अगर लोणारी कोळसा जाळील किंवा कोणतेही वनोत्पादन गोळा करील, त्यावर कोणतीही निर्मिती-प्रक्रिया करील किंवा ते तेथून घेऊन जाईल ;

(ग) कलम ३० अन्वये केलेली कोणतीही मनाई उल्लंघून, संरक्षित वनांतील कोणत्याही जमिनीची लागवडीसाठी किंवा अन्य प्रयोजनार्थ नांगरट करील किंवा जंगलतोड करील ;

(घ) अशा वनाला आग लावील, किंवा ही आग कलम ३० अन्वये राखीव म्हणून असलेल्या कोणत्याही झाडापर्यंत—मग ते झाड उभे, पडलेले अथवा पाडलेले किंवा कसेही असो—किंवा अशा वनांच्या कोणत्याही बंद भागापर्यंत पोहचणार नाही अशा प्रकारे कोणतीही योग्य खबरदारी न घेता, जाळ करील ;

(ङ) अशा कोणत्याही झाडांच्या किंवा बंद भागाच्या आसपास कोणताही जाळ पेटवून व पेटता जाळ तसाच ठेवून निघून जाईल ;

(च) पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे राखीव असलेल्या कोणत्याही झाडाची ज्यायोगे नासाडी होईल अशा पद्धतीने कोणतेही झाड पाडील किंवा कोणतेही इमारती लाकूड तोडून नेईल ;

(छ) गुराढोरांना अशा कोणत्याही झाडाची नासधूस करू देईल ;

(ज) कलम ३२ अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करील ;

ती व्यक्ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(२) जेव्हा जेव्हा एखाद्या संरक्षित वनामध्ये हेतुपुरस्सर आग लावली जाईल किंवा अक्षम्य हयगयीमुळे आग लागेल तेव्हा, या कलमान्वये कोणतीही शास्ती लादण्यात आलेली असली तरीही, राज्य शासन त्याला योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत, अशा वनांत किंवा त्याच्या कोणत्याही भागात गुरे चारण्याचा किंवा वनोत्पादनाबाबतचा कोणताही अधिकार तहकूब ठेवण्यात यावा, असा निदेश देऊ शकेल.

काही विशिष्ट बाबतीत करण्यात आलेल्या कृतींना या प्रकरणातील कोणत्याही गोष्टींमुळे मनाई नाही.

३४. कलम २९ अन्वये नोंदण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करून, वन अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीने किंवा कलम ३२ अन्वये करण्यात आलेल्या नियमांनुसार केलेल्या, अथवा कलम ३० अन्वये वनातील बंद केलेल्या कोणत्याही भागाचा किंवा कलम ३३ अन्वये ज्यांच्या वापरास तहकुबी देण्यात आली आहे अशा कोणत्याही अधिकारांचा संबंध जेथवर पोचतो तेवढी मर्यादा खेरीजकरून एरव्ही केल्या जाणाऱ्या कोणत्याही कृतीला या प्रकरणातील कोणत्याही गोष्टींमुळे मनाई होते असे मानले जाणार नाही.

## प्रकरण पाच

## शासनाची मालकी नसलेली वने व जमिनी यांवरील नियंत्रणाबाबत

विशेष प्रयोजनांकरिता वन संरक्षण.

३५. (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,

कोणत्याही वनात, किंवा पडीत जमिनीत, पुढील बाबींचे विनियमन करता येईल किंवा त्यांना मनाई करता येईल—

(क) लागवडीसाठी नांगरट करणे किंवा जंगलतोड करणे ;

(ख) गुरे चारणे ; किंवा

(ग) झाडे-झुडपे जाळून टाकणे किंवा साफ करणे ;

असे विनियमन किंवा मनाई पुढीलपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी आवश्यक असेल तेव्हा करता येईल :—

(एक) वादळ, वारे, घरंगळत येणारे दगड, पूर आणि हिमानी यांपासून संरक्षण ;

(दोन) डोंगराळ भागातील सुळके व उतार आणि दरीखोरे येथील मातीचे परिरक्षण करणे, भूस्खलनास वा घळी आणि पाण्याचा स्त्रोत तयार होण्यास प्रतिबंध करणे किंवा जमिनीची धूप होण्यापासून किंवा तीवर वाळू, दगड वा खडे साचण्यापासून तिचे संरक्षण करणे ;

(तीन) झरे, नद्या आणि तलाव यांमधील पाण्याचा साठा राखून ठेवणे ;

(चार) रस्ते, पूल, रेल्वे आणि दळणवळणाच्या अन्य मार्गांचे संरक्षण करणे ; आणि

(पाच) सार्वजनिक आरोग्य राखणे.

(२) राज्य शासन, स्वतःला योग्य वाटेल अशा कोणत्याही प्रयोजनासाठी, स्वतःच्याच खर्चाने कोणत्याही वनात किंवा पडीत जमिनीमध्ये कोणतेही बांधकाम करू शकेल.

(३) अशा वनाच्या किंवा जमिनीच्या मालकावर नोटीस बजावण्यात येऊन, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वाजवी कालावधीत अधिसूचना का काढण्यात येऊ नये किंवा, यथास्थिती, असे बांधकाम का करण्यात येऊ नये त्यासंबंधीचे कारण दाखवण्यास फर्मावण्यात आले असून, त्या मालकाने कोणतेही आक्षेप घेतल्यास ते आणि त्यांच्या पुष्ट्यर्थ तो सादर करील असा कोणताही पुरावा, राज्य शासनाने या संबंधात नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने ऐकून घेतल्याखेरीज व राज्य शासनाने त्यावर विचार केल्याखेरीज, पोटकलम (१) अन्वये कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही किंवा पोटकलम (२) अन्वये कोणतेही काम सुरु केले जाणार नाही.

वनांचे व्यवस्थापन करण्याचे काम स्वतःकडे घेण्याचा अधिकार.

३६. (१) कलम ३५ खालील कोणताही विनियम किंवा कोणतीही मनाई याकडे दुर्लक्ष करण्यात आले अगर त्यांची जाणूनबुजुन अवज्ञा करण्यात आली तर त्याबाबतीत, अथवा त्या कलमान्वये करावयाच्या कोणत्याही बांधकामाच्या प्रयोजनासाठी तसे आवश्यक असेल तर, राज्य शासन, अशा वनाच्या किंवा जमिनीच्या मालकाला लेखी नोटीस दिल्यानंतर आणि त्याचे कोणतेही आक्षेप असल्यास ते विचारात घेतल्यानंतर ते वन किंवा ती जमीन वन अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली आणील आणि राखीव वनांच्या संबंधातील या अधिनियमातील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही तरतुदी अशा वनाला किंवा जमिनीला लागू होतील असे घोषित करू शकेल.

(२) अशा वनाचे किंवा जमिनीचे व्यवस्थापन करण्यापासून मिळणारा कोणताही निव्वळ नफा असल्यास, तो सदर मालकाला देण्यात येईल.

विशिष्ट बाबतीत वनांचे स्वामित्वहरण.

३७. (१) या प्रकरणाखालील ज्या कोणत्याही बाबतीत, वन किंवा जमीन ही वन अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली न ठेवता सार्वजनिक प्रयोजनार्थ संपादित करण्यात यावी असे राज्य शासनाला वाटेल त्याबाबतीत, राज्य शासन, "भूमि संपादन अधिनियम, १८९४" (१८९४ चा १) याद्वारे तरतूद केलेल्या पद्धतीने ते वन आणि ती जमीन संपादित करण्याची कार्यवाही करू शकेल.

(२) कलम ३५ खालील कोणत्याही अधिसूचनेत समाविष्ट केलेल्या कोणत्याही वनाच्या किंवा जमिनीच्या मालकाला, त्या अधिसूचनेच्या दिनांकापासून कमीत कमी तीन किंवा जास्तीत जास्त बारा वर्षांच्या कोणत्याही अवधीत, असे वन किंवा जमीन सार्वजनिक प्रयोजनार्थ संपादित करण्यात येईल, असे फर्माविता येईल, आणि त्यानुसार, राज्य शासन, असे वन किंवा जमीन संपादित करील.

**मालकांच्या विनंतीवरून वनांचे संरक्षण.**

३८. (१) कोणत्याही जमिनीचा मालक किंवा जर त्या जमिनीचे एकाहून अधिक मालक असतील तर त्यामधील हिश्श्यांपैकी एकूण दोन-तृतीयांश हिश्श्यांचे मालक, अशा जमिनीवर वनांची वाढ करण्याच्या किंवा त्यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्याकडे पुढीलप्रमाणे आपला मनोदय व्यक्त करणारे एक लेखी अभिवेदन सादर करू शकेल किंवा करू शकतील, ते असे की—

(क) त्यांच्या वतीने वन अधिकाऱ्याने अशा जमिनीची राखीव किंवा संरक्षित वन म्हणून परस्पर संमत होतील अशा अटींनुसार व्यवस्था पहावी ; किंवा

(ख) या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही तरतुदी अशा जमिनीला लागू करण्यात याव्यात.

(२) दोन्ही बाबतीत, राज्य शासन, अशा जमिनीच्या परिस्थितीनुसार त्यास योग्य वाटतील अशा किंवा अर्जदारांची इच्छा असेल त्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अशा जमिनीला लागू करू शकेल.

## प्रकरण सहा

## इमारती लाकूड आणि अन्य वनोत्पादन यांवरील शुल्काबाबत

**इमारती लाकूड व अन्य वनोत्पादन यांवर शुल्क बसवण्याचा अधिकार.**

३९. (१) [१][केंद्र सरकार], **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ते घोषित करील अशा रीतीने, अशा ठिकाणी व अशा दरांनी,—

(क) जी इमारती लाकडे व अन्य वनोत्पादन यांची [२][हा अधिनियम ज्यांना लागू होतो अशा क्षेत्रात] उपज झाली आहे आणि ज्याबाबत शासनाला कोणताही हक्क आहे त्यांवर ;

(ख) जी इमारती लाकडे व अन्य वनोत्पादन [२][हा अधिनियम ज्यांना लागू होतो अशा क्षेत्रांबाहेर] असलेल्या कोणत्याही ठिकाणाहून आणली आहेत त्यांवर,

शुल्क आकारू शकेल.

[३]* * * * *

(२) ज्या ज्या बाबतीत मूल्यानुसार शुल्क आकारावयाचे निदेश देण्यात आले आहेत अशा प्रत्येक बाबतीत, [१][केंद्र सरकार], ज्याच्यावर असे शुल्क आकारले जाणार आहे ते मूल्य तशाच अधिसूचनेद्वारे निश्चित करू शकेल.

(३) कोणत्याही क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आला त्यावेळी त्या क्षेत्रात राज्य शासनाच्या प्राधिकारान्वये इमारती लाकूड आणि वनोत्पादन यावर आकारले जात होते असे सर्व शुल्क हे, या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये रीतसर आकारलेले आहे व आकारलेले होते असे समजण्यात येईल.

[४][(४) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी ; [५][संविधानाच्या][६] प्रारंभापूर्वी त्यावेळी जसे अंमलात होते तसे या कलमाखालील राज्य शासन जे शुल्क कायदेशीररीत्या आकारीत होते असे कोणतेही शुल्क, [७][संसदेकडून] विरुद्ध तरतूद करण्यात येईपर्यंत आकारण्याचे चालू ठेवील :

परंतु असे की, या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्यातील इमारती लाकूड किंवा अन्य वनोत्पादन आणि राज्याबाहेरील स्थानिक भागातील तत्सम उत्पादन या दोहोंमध्ये पहिल्यास अनुकूल असा भेदभाव करणारे अथवा राज्याबाहेरच्या भागातील इमारती लाकूड किंवा अन्य वनोत्पादन यांच्याबाबतीत, एका स्थानिक भागातील इमारती लाकूड किंवा वनोत्पादन आणि दुसऱ्या भागातील तत्सम इमारती लाकूड किंवा वनोत्पादन यांच्यामध्ये भेदभाव करणारे कोणतेही शुल्क आकारण्याचा प्राधिकार मिळत नाही.]

---

१. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूल (क्रमांक ३) आदेश, १९५६ द्वारे "भाग क राज्ये व भाग ग राज्ये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे हे परंतुक निरसित करण्यात आले.

४. वरील आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "भारत सरकार अधिनियम, १९३५ याच्या भाग तीन च्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. अर्थात २६ जानेवारी १९५०.

७. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "केंद्रीय विधानमंडळ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

खरेदी रक्कम किंवा स्वामित्वधन यांना मर्यादा लागू नाही.

४०. कोणतेही इमारती लाकूड किंवा अन्य वनोत्पादन यावर ज्या पद्धतीने शुल्क आकारण्यात येते त्याच पद्धतीने खरेदी रक्कम किंवा स्वामित्वधन म्हणून कोणतीही रक्कम आकारणीयोग्य असल्यास, ती रक्कम, असे इमारती लाकूड किंवा वनोत्पादन यांच्यावर, ते मार्गस्थ असताना आकारण्यात येत असली तरी, त्यावर या प्रकरणातील कोणत्याही गोष्टीमुळे मर्यादा पडते असे मानण्यात येणार नाही.

## प्रकरण सात

## इमारती लाकडाची किंवा वनोत्पादनाची ने-आण करण्यात येत असताना त्यावर ठेवावयाच्या नियंत्रणाबाबत

वनोत्पादनाची ने-आण करण्याचे नियम करण्याचा अधिकार.

४१. (१) इमारती लाकडे वाहून आणण्यासंबंधी सर्व नद्या आणि त्यांचे तट यांचे नियंत्रण, तसेच ज्यांची ने-आण भूमार्गे किंवा जलमार्गे चालू आहे अशा सर्व इमारती लाकडाचे किंवा वनोत्पादनाचे नियंत्रण हे राज्य शासनाकडे निहित असेल, आणि ते शासन, सर्व इमारती लाकूड आणि अन्य वनोत्पादन यांची ने-आण नियंत्रित करण्यासाठी नियम करू शकेल.

(२) विशेषकरून आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न येऊ देता, अशा नियमांद्वारे,—

(क) फक्त ज्या मार्गांनी इमारती लाकडे किंवा अन्य वनोत्पादने राज्यात आयात, तेथून बाहेर निर्यात करता येईल अथवा तेथून ने-आण करता येईल असे मार्ग कोणते ते विहित करता येईल ;

(ख) पास देण्यास रीतसर प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून पास घेतल्याशिवाय किंवा अशा पासाच्या शर्तीचे पालन केल्यावाचून अन्यथा असे इमारती लाकूड किंवा अन्य वनोत्पादन यांची आयात किंवा निर्यात अथवा ते ने-आणं करण्यास मनाई करता येईल ;

(ग) असे पास देणे, ते सादर करणे आणि परत करणे यासंबंधी आणि त्याच्या करता फी देण्यासंबंधी तरतूद करता येईल ;

(घ) ज्या इमारती लाकडाच्या किंवा वनोत्पादनाच्या ने-आणी संबंधात त्याच्या किमतीपोटी, किंवा त्याच्यावर देय असलेले कोणतेही शुल्क, फी, स्वामित्वधन किंवा आकार यापोटी, कोणतीही रक्कम शासनाला देय आहे असे मानण्यास कारण आहे अथवा या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ ज्यावर निशाणी लावणे इष्ट आहे अशा इमारती लाकडाची किंवा अन्य वनोत्पादनाची ने-आण थांबवणे, त्याची खबर देणे, त्याची तपासणी करणे व त्यावर निशाणी लावणे, यासाठी तरतूद करता येईल ;

(ङ) ज्या आगारांमध्ये असे इमारती लाकूड किंवा अन्य उत्पादने तपासणी करण्यासाठी त्याबद्दलचे पैसे भरण्यासाठी किंवा त्यावर अशा निशाण्या लावता याव्यात यासाठी ते जिच्या ताब्यात आहेत अशा व्यक्तीकडून आणावे लागेल अशा आगारांची स्थापना व विनियमन यासंबंधी, आणि कोणत्या अटींवर असे इमारती लाकूड किंवा अन्य उत्पादन आगारांमध्ये आणले जाईल, साठवले जाईल किंवा तेथून हलवले जाईल त्याबाबत तरतूद करता येईल ;

(च) इमारती लाकूड आणि अन्य वनोत्पादन यांची ने-आण करण्याकरिता जिचा उपयोग करण्यात येतो अशा नदीचा प्रवाह किंवा तिचे तट, बंद करण्यास किंवा त्यावर अडथळे निर्माण करण्यास आणि अशा नदीमध्ये गवत, खुरटी झाडी, फांद्या, पाने टाकण्यात किंवा ज्यायोगे असा नदीप्रवाह बंद होईल किंवा त्यास अडथळा निर्माण होईल अशा कोणत्याही कृतीस मनाई करता येईल ;

(छ) अशा कोणत्याही नदीचा प्रवाह किंवा तट यावर कोणताही अडथळा निर्माण होण्यास प्रतिबंध करण्यासाठी किंवा तो दूर करण्यासाठी आणि ज्या व्यक्तीच्या कृतींमुळे किंवा हयगयीमुळे असा अडथळा निर्माण झाला आहे त्या व्यक्तीकडून, अशा अडथळ्याचा प्रतिबंध करण्यासाठी किंवा तो दूर करण्यासाठी करावा लागलेला खर्च वसूल करण्यासाठी तरतूद करता येईल ;

(ज) विनिर्दिष्ट स्थानिक मर्यादांच्या आत लाकूड कापण्याचे करवतणी खड्डे तयार करणे, इमारती लाकडाचे रूपांतर करणे, त्याची कटाई करणे, ते जाळणे, लपवून ठेवणे किंवा त्यावर निशाण्या लावणे, त्यावरील निशाण्यांमध्ये फेरबदल करणे किंवा त्या निशाण्या नष्ट करणे, अथवा निशाणी लावण्याचे हातोडे किंवा इमारती लाकडावर निशाणी उमटवण्यासाठी वापरली जाणारी अन्य साधने जवळ बाळगणे किंवा स्वतः बरोबर घेऊन जाणे या गोष्टींना संपूर्ण किंवा सशर्त मनाई करता येईल ;

(झ) इमारती लाकडाविषयीच्या स्वामित्व चिन्हांचा वापर आणि अशा चिन्हांची नोंदणी यासंबंधी नियमन करता येईल, अशी नोंदणी किती काळपर्यंत अंमलात राहील ते विहित करता येईल ; कोणत्या एका व्यक्तीला अशी किती चिन्हे नोंदवता येतील ती संख्या मर्यादित करता येईल आणि अशा नोंदीसाठी फी आकारण्यासंबंधी तरतूद करता येईल.

(३) या कलमान्वये केलेला कोणताही नियम, एखाद्या विनिर्दिष्ट प्रकारच्या इमारती लाकडाला किंवा अशा अन्य वनोत्पादनाला अथवा एखाद्या विशिष्ट स्थानिक क्षेत्राला लागू होणार नाही असे राज्य शासन निदेशित करू शकेल.

**सीमाशुल्क सरहद्दीवरून इमारती लाकडाची ने-आण करण्याबाबतचे केंद्र सरकारचे अधिकार.**

[1][**४१क.** कलम ४१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी [2][ज्या क्षेत्रांना हा अधिनियम लागू होतो अशा क्षेत्रांच्या] आत किंवा तेथून इमारती लाकडाची किंवा अन्य वनोत्पादनाची केंद्र सरकारने निश्चित केलेल्या सीमाशुल्क सरहद्दीवरून ज्या मार्गाने आयात, निर्यात किंवा ने-आण करता येईल तो मार्ग विहित करण्यासाठी केंद्र सरकार नियम करू शकेल आणि कलम ४१ अन्वये केलेले कोणतेही नियम, या कलमान्वये केलेल्या नियमांच्या अधीन राहून लागू होतील.]

**कलम ४१ अन्वये करण्यात आलेल्या नियमांचा भंग करण्याबद्दल शास्ती.**

**४२.** (१) राज्य शासन, अशा नियमांच्या उल्लंघनाबद्दल शास्ती म्हणून सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा अशा नियमांद्वारे विहित करू शकेल.

(२) ज्या प्रकरणी गुन्हा हा सूर्यास्तानंतर आणि सूर्योदयापूर्वी करण्यात आलेला असेल, किंवा कायदेशीर प्राधिकाऱ्याला विरोध करण्याच्या पूर्वतयारीनिशी करण्यात आलेला असेल, किंवा गुन्हेगार हा तशाच गुन्ह्याबद्दल पूर्वी सिद्धदोष ठरलेला असेल अशा प्रकरणी, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या शिक्षेच्या दुप्पट शिक्षा ठोठावण्याबाबत अशा नियमांमध्ये तरतूद करता येईल.

**आगारात असताना वनोत्पादन खराब झाल्याबद्दल शासन आणि वन अधिकारी जबाबदार नाहीत.**

**४३.** कोणतेही इमारती लाकूड किंवा अन्य वनोत्पादन, कलम ४१ अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमान्वये स्थापन केलेल्या आगारात असताना किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अन्यत्र रोखून ठेवले असताना, त्याची कोणत्याही प्रकारे हानी झाल्यास किंवा ते कोणत्याही प्रकारे खराब झाल्यास, त्याबद्दल शासन जबाबदार राहणार नाही, आणि कोणत्याही वन अधिकाऱ्याच्या हयगयीमुळे, दुर्भावामुळे किंवा कपटामुळे अशी हानी किंवा ते खराब झाले नसेल तर, तो अशा कोणत्याही हानीबद्दल किंवा खराब झाल्याबद्दल जबाबदार राहणार नाही.

**आगारात अपघात घडल्यास मदत करणे सर्व व्यक्तींवर बंधनकारक.**

**४४.** जर कोणत्याही अपघातामुळे किंवा संकट प्रसंगामुळे अशा कोणत्याही आगारातील कोणतीही मालमत्ता धोक्यात आलेली असेल तर, अशा आगारात काम करणारी प्रत्येक व्यक्ती—मग ती शासनाने नेमलेली असो वा कोणत्याही खाजगी व्यक्तीने नेमलेली असो,—संकट निवारणासाठी किंवा मालमत्तेची हानी किंवा ती खराब होऊ नये म्हणून तिचे संरक्षण करण्यासाठी सहाय्य मागणाऱ्या कोणत्याही वन अधिकाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याला मदत करील.

## प्रकरण आठ

## वाहत येणारे व अडकलेले इमारती लाकूड गोळा करण्याच्या संबंधात

**विशिष्ट प्रकारच्या इमारती लाकडावरील स्वत्वाधिकार शाबीत होईपर्यंत ते शासनाची मालमत्ता म्हणून समजण्यात येईल आणि त्याप्रमाणे ते गोळा करण्यात येईल.**

**४५.** (१) वाहत असलेले, किनाऱ्याला लागलेले, अडकलेले किंवा बुडालेले सर्व इमारती लाकूड ;

कलम ४१ अन्वये करण्यात आलेल्या नियमांनुसार नोंदणी न केलेल्या निशाण्या अंकित असणारे अथवा आगीमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणाने ज्यावरील निशाण्या पुसल्या गेल्या आहेत, बदलल्या आहेत किंवा विरूपित झाल्या आहेत असे सर्व लाकूड किंवा इमारती लाकूड ; आणि

राज्य शासन निर्देशित करील अशा क्षेत्रांमधील निशाण्या न लावलेले सर्व लाकूड किंवा इमारती लाकूड ; यावर कोणतीही व्यक्ती त्यासंबंधी या प्रकरणात तरतूद केल्याप्रमाणे आपला अधिकार आणि स्वत्वाधिकार शाबीत करीपर्यंत ती शासनाची मालमत्ता म्हणून समजण्यात येईल.

(२) असे इमारती लाकूड, कोणत्याही वन अधिकाऱ्याला किंवा कलम ५१ अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या आधारे ते लाकूड गोळा करण्यास हक्कदार असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीला गोळा करता येईल, व वन अधिकारी असे वाहत येणारे लाकूड जेथे स्वीकारावयाचे ते आगार अधिसूचित करील त्या आगारात ते आणता येईल.

---

१. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

२. विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एखाद्या जातीच्या इमारती लाकडास या कलमाच्या तरतुदींमधून सूट देऊ शकेल.

**वाहत आलेल्या इमारती लाकडासंबंधीच्या हक्कमागणीदारांना नोटीस.**

**४६.** कलम ४५ अन्वये गोळा करण्यात आलेल्या इमारती लाकडाबाबत वन अधिकारी वेळोवेळी जाहीर नोटीस देईल. अशा नोटिशीत इमारती लाकडाचे वर्णन दिलेले असेल आणि अशा लाकडावर हक्कमागणी सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने विशिष्ट मुदतीत अशा हक्कमागणीसंबंधीचे लेखी निवेदन अशा अधिकाऱ्याकडे सादर करावे असे तीद्वारे फर्माविण्यात येईल—अशी मुदत नोटिशीच्या दिनांकापासून किमान दोन महिने इतकी असेल.

**अशा इमारती लाकडाच्या संबंधात हक्कमागणी दाखल करण्यात आल्यानंतरची कार्यपद्धती.**

**४७.** (१) पूर्वोक्त असे कोणतेही निवेदन सादर करण्यात येईल तेव्हा, वन अधिकारी, स्वतःला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, एकतर कारणे नमूद करून अशी हक्कमागणी फेटाळून लावील, किंवा असे इमारती लाकूड हक्कमागणीदाराच्या स्वाधीन करील.

(२) एकापेक्षा अधिक व्यक्तींनी अशा इमारती लाकडासंबंधी हक्कमागणी केलेली असेल तर, वन अधिकाऱ्याला अशा लाकडासाठी जी व्यक्ती हक्कदार आहे असे वाटेल त्या व्यक्तीस तो असे लाकूड देईल किंवा त्या व्यक्तींना दिवाणी न्यायालयाकडे निर्देशित करील आणि अशा कोणत्याही न्यायालयाकडून त्या लाकडाच्या विल्हेवाटीसंबंधी आदेश येईपर्यंत ते लाकूड ठेवून घेईल.

(३) ज्या व्यक्तींची हक्कमागणी या कलमान्वये फेटाळून लावण्यात आली आहे अशी कोणतीही व्यक्ती, तिने मागणी केलेले इमारती लाकूड ताब्यात घेण्यासाठी, अशी हक्कमागणी फेटाळून लावण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत दावा दाखल करू शकेल,—मात्र कोणत्याही व्यक्तीला या कलमान्वये अशाप्रकारे मागणी फेटाळून लावल्याबद्दल किंवा इमारती लाकूड ठेवून घेतल्याबद्दल किंवा ते हलविल्याबद्दल किंवा अन्य व्यक्तीला दिल्याबद्दल शासनाकडून किंवा कोणत्याही वन अधिकाऱ्याकडून कोणतीही नुकसानभरपाई किंवा खर्च वसूल करता येणार नाही.

(४) कोणतेही इमारती लाकूड, या कलमात तरतूद केल्याप्रमाणे सुपूर्द करण्यात येईपर्यंत किंवा त्याबद्दल दावा दाखल करण्यात येईपर्यंत त्यावर कोणतीही दिवाणी, फौजदारी किंवा महसुली आदेशिका काढली जाणार नाही.

**मागणी न केलेल्या इमारती लाकडाची विल्हेवाट.**

**४८.** जर पूर्वोक्त असे निवेदन सादर करण्यात आले नाही, किंवा कलम ४६ अन्वये काढण्यात आलेल्या नोटिशीद्वारे निश्चित केलेल्या पद्धतीने व तितक्या मुदतीमध्ये हक्कमागणीदाराने हक्कमागणी दाखल करण्यात कसूर केली किंवा त्याने अशी हक्कमागणी या प्रमाणे दाखल केल्यावर ती फेटाळून लावण्यात आली असता, असे इमारती लाकूड ताब्यात घेण्यासाठी कलम ४७ द्वारे निश्चित केलेल्या पुढील मुदतीच्या आत दावा दाखल करण्यात त्याने कसूर केली तर, अशी इमारती लाकडाची मालकी शासनाकडे, किंवा जेव्हा असे इमारती लाकूड, कलम ४७ अन्वये अन्य व्यक्तीकडे देण्यात आलेले असेल तेव्हा, अशा अन्य व्यक्तीने स्वतः निर्माण न केलेल्या अशा सर्व भारांपासून मुक्त होऊन अशाप्रकारे त्या व्यक्तीकडे निहित होईल.

**शासन किंवा त्याचे अधिकारी असे इमारती लाकूड खराब होण्याबद्दल जबाबदार नाहीत.**

**४९.** कलम ४५ अन्वये गोळा करण्यात आलेल्या कोणत्याही इमारती लाकडाची कोणत्याही प्रकारे हानी झाल्यास अगर ते कोणत्याही प्रकारे खराब झाल्यास त्याबद्दल शासन जबाबदार राहणार नाही, व तसेच कोणत्याही वन अधिकाऱ्याच्या हयगयीमुळे, दुर्भावामुळे किंवा कपटामुळे अशी हानी झाली नसेल किंवा ते खराब झाले नसेल तर, तो अशा कोणत्याही हानीबद्दल किंवा खराब होण्याबद्दल जबाबदार राहणार नाही.

**इमारती लाकूड हक्कमागणीदाराकडे सुपूर्द करण्यात येण्यापूर्वी त्याने भरावयाचे पैसे.**

**५०.** पूर्वोक्तानुसार गोळा केलेल्या किंवा सुपूर्द करावयाच्या इमारती लाकडाच्या संबंधात कलम ५१ अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाखाली देय असलेली रक्कम वन अधिकाऱ्याकडे किंवा अशी रक्कम स्वीकारण्यास हक्कदार असणाऱ्या अन्य व्यक्तीकडे भरण्यात येईपर्यंत कोणीही व्यक्ती अशा कोणत्याही इमारती लाकडाचा ताबा परत मिळवण्यास हक्कदार होणार नाही.

**नियम करण्याचा आणि शास्ती विहित करण्याचा अधिकार.**

**५१.** (१) राज्य शासन, [1][**राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढील बाबींचे विनियमन करण्यासाठी नियम करू शकेल] त्या बाबी म्हणजे,—

(क) कलम ४५ मध्ये उल्लेखिलेले सर्व इमारती लाकूड तारणे, गोळा करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे ;

(ख) इमारती लाकूड तारण्यासाठी आणि गोळा करण्यासाठी वापरावयाच्या नौकांचा वापर आणि त्यांची नोंदणी ;

(ग) असे इमारती लाकूड तारण्याकरिता, गोळा करण्याकरिता, त्याची ने-आण करण्याकरिता, ते साठवून ठेवण्याकरिता किंवा त्याची विल्हेवाट लावण्याकरिता द्यावयाच्या रकमा ; आणि

(घ) अशा इमारती लाकडावर निशाण्या लावण्यासाठी वापरावयाचे हातोडे आणि अन्य साधने यांचा वापर व नोंदणी.

१. सन २००५ चा अधिनियम क्रमांक ४, २५ (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][(१क.) या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर सादर करण्यात येईल.]

(२) राज्य शासन, या कलमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या उल्लंघनाबद्दल शास्ती म्हणून सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा, किंवा या दोन्ही शिक्षा विहित करू शकेल.

## प्रकरण नऊ

## शास्ती आणि कार्यपद्धती

**सरकारजमा करण्यास पात्र असलेल्या मालमत्तेचे अभिग्रहण.**

**५२.** (१) कोणत्याही वनोत्पादनाच्या संबंधात कोणताही वनविषयक अपराध करण्यात आला आहे असे मानण्यास संयुक्तिक कारण असल्यास, असे वनोत्पादन, आणि असा कोणताही अपराध करतेवेळी वापरण्यात आलेली सर्व हत्यारे, नौका, वाहने किंवा गुरेढोरे कोणत्याही वन अधिकाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याला सक्तीने ताब्यात घेता येतील.

(२) या कलमान्वये कोणत्याही मालमत्तेचे अभिग्रहण करणारा प्रत्येक अधिकारी हा, त्या मालमत्तेचे अभिग्रहण करण्यात आलेले आहे हे सूचित करण्यासाठी त्या मालमत्तेवर एक चिन्ह लावील, आणि ज्या अपराधाबद्दल असे अभिग्रहण करण्यात आलेले आहे त्या अपराधाची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याला शक्य तितक्या लवकर अशा अभिग्रहणाचे वृत्त कळवील :

परंतु असे की, ज्या वनोत्पादनाच्या संबंधात असा अपराध घडल्याचे कळले ते वनोत्पादन शासनाच्या मालकीचे असेल आणि अपराधी अज्ञात असेल त्याबाबतीत, त्या अधिकाऱ्याने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला ती परिस्थिती शक्य तितक्या लवकर कळविली तरी पुरेसे होईल.

**कलम ५२ अन्वये ताब्यात घेतलेली मालमत्ता मुक्त करण्याचा अधिकार.**

**५३.** वनक्षेत्रपालाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या त्या कोणत्याही वन अधिकाऱ्याने किंवा त्यास दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याने कलम ५२ अन्वये कोणतीही हत्यारे, नौका, वाहने किंवा गुरेढोरे सक्तीने ताब्यात घेतली असतील तो अधिकारी किंवा त्यास दुय्यम असलेला अधिकारी, अशी मालमत्ता मुक्त करावयाची झाल्यास, अशी मालमत्ता ज्या अपराधाबद्दल ताब्यात घेण्यात आली आहे त्या अपराधाची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्यासमोर, अशाप्रकारे मुक्त करावयाची मालमत्ता, ती हजर करण्याबाबत फर्मावण्यात आले तर व येईल तेव्हा, ती हजर करण्याविषयी त्या मालकाने बंधपत्र लिहून दिल्यानंतर ती मालमत्ता मुक्त करू शकेल.

**तद्नंतरची कार्यपद्धती.**

**५४.** असा कोणताही अहवाल मिळाल्यानंतर, दंडाधिकारी सोईस्कर असेल त्याप्रमाणे, शक्य तितक्या तत्परतेने अपराध्याला अटक करण्यासाठी, त्याची न्यायचोकशी करण्यासाठी व कायद्यानुसार मालमत्तेची विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक अशी उपाययोजना करील.

**वनोत्पादन, हत्यारे, इत्यादी सरकारजमा करण्यास केव्हा पात्र असतील.**

**५५.** (१) जे शासनाच्या मालकीचे नाही व ज्याच्यासंबंधात वनविषयक कोणताही अपराध घडलेला आहे असे सर्व इमारती लाकूड किंवा वनोत्पादन आणि हा वनविषयक अपराध करताना वापरलेली गेलेली सर्व हत्यारे, नौका, वाहने आणि गुरेढोरे, सरकारजमा होण्यास पात्र होतील.

(२) सरकारजमा करण्याची ही कारवाई अशा अपराधासाठी विहित केलेल्या अन्य कोणत्याही शिक्षेव्यतिरिक्त असेल.

**वनोत्पादनाच्या संबंधात वनविषयक अपराध घडला असल्यास, त्या अपराधाची न्यायचौकशी संपली की, त्या मालाची विल्हेवाट लावणे.**

**५६.** कोणत्याही वनविषयक अपराधाची न्यायचौकशी समाप्त झाली की, ज्याच्या संबंधात असा अपराध करण्यात आला आहे असे कोणतेही वनोत्पादन जर शासनाच्या मालकीचे असेल किंवा ते सरकारजमा करण्यात आलेले असेल तर, असे वनोत्पादन, वन अधिकारी ताब्यात घेईल, आणि अन्य कोणत्याही बाबतीत, न्यायालय निदेश देईल त्या पद्धतीने त्याची विल्हेवाट लावण्यात येईल.

**अपराधी ज्ञात नसेल किंवा सापडू शकत नसेल त्यावेळी अनुसरावयाची कार्यपद्धती.**

**५७.** अपराधी ज्ञात नसेल किंवा तो सापडू शकत नसेल अशा बाबतीत, अपराध करण्यात आलेला आहे असे दंडाधिकाऱ्यास आढळून आल्यास, तो, अपराध ज्या मालमत्तेच्या संबंधात करण्यात आलेला आहे ती मालमत्ता सरकारजमा करण्याचा आणि वन अधिकाऱ्याने ती ताब्यात घेण्याचा किंवा दंडाधिकाऱ्याच्या मते जी व्यक्ती त्या मालमत्तेचा हक्कदार असेल त्या व्यक्तीला ती देण्याचा आदेश काढू शकेल :

---

१. सन २००५ चा अधिनियम क्रमांक ४, कलम २५ (ख) द्वारे हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

परंतु असे की, अशी मालमत्ता ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचा कालावधी संपेपर्यंत किंवा अशा मालमत्तेवरील कोणताही अधिकार सांगणारी कोणतीही व्यक्ती असल्यास तिचे म्हणणे आणि अशा हक्क मागणीच्या पुष्ट्यर्थ तिने कोणताही पुरावा सादर केल्यास तो ऐकून घेतल्याखेरीज, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

**कलम ५२ अन्वये अभिग्रहण केलेल्या नाशवंत मालमत्तेच्या संबंधातील कार्यपद्धती.**

५८. दंडाधिकारी, यात यापूर्वी काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कलम ५२ अन्वये अभिग्रहण केलेल्या आणि नैसर्गिकरीत्या लवकर नाश पावणाऱ्या कोणत्याही मालमत्तेची विक्री करण्याचे निदेश देऊ शकेल आणि ती मालमत्ता विकण्यात आली नसती तर, त्याने ज्या पद्धतीने तिची विल्हेवाट लावली असती त्याच पद्धतीने तिच्या विक्रीच्या उत्पन्नाची विल्हेवाट लावू शकेल.

**कलम ५५, कलम ५६ किंवा कलम ५७ खालील आदेशांविरूद्ध अपील.**

५९. कलम ५२ अन्वये ज्या अधिकाऱ्याने एखादी मालमत्ता अभिग्रहित केली असेल त्या अधिकाऱ्यास किंवा त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा अशारीतीने अभिग्रहित केलेल्या मालमत्तेमध्ये हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, कलम ५५, कलम ५६ किंवा कलम ५७ अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आंत त्यांच्याविरुद्ध, अशा दंडाधिकाऱ्याने काढलेल्या आदेशांवर ज्या न्यायालयाकडे सर्वसाधारणपणे अपील होऊ शकते, अशा न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल, आणि अशा अपिलांती काढण्यात येणारा आदेश अंतिम असेल.

**मालमत्ता शासनाकडे केव्हा निहित होते.**

६०. जेव्हा कलम ५५, किंवा यथास्थिति, कलम ५७ अन्वये कोणतीही मालमत्ता सरकारजमा करण्यासंबंधीचा आदेश काढण्यात आला असेल आणि अशा आदेशावर अपील करण्यासाठी कलम ५९ अन्वये घातलेली कालमर्यादा टळून गेली असेल, आणि कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल किंवा असे अपील दाखल करण्यात येऊन अपील न्यायालयाने अशा संपूर्ण मालमत्तेच्या किंवा तिच्या काही भागांच्या संबंधात असा आदेश कायम केला असेल तर, अशी मालमत्ता, किंवा यथास्थिति, असा तिचा भाग सर्व भारांपासून मुक्त अवस्थेत शासनाकडे निहित होईल.

**ताब्यात घेतलेली मालमत्ता मुक्त करण्याच्या अधिकाराची व्यावृत्ती.**

६१. कलम ५२ अन्वये अभिग्रहण केलेली कोणतीही मालमत्ता तात्काळ मुक्त करण्याविषयी केव्हाही निदेश देण्यास राज्य शासनाने यासंबंधात अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला यात यापूर्वी अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही.

**अन्यायाने केलेल्या जप्तीबद्दल शिक्षा.**

६२. जो कोणताही वन अधिकारी किंवा पोलीस अधिकारी, एखादी मालमत्ता या अधिनियमान्वये सरकार जमा करण्यास व सक्तीने ताब्यात घेण्यास पात्र आहे या सबबीखाली—परंतु विनाकारण त्रास देण्याच्या हेतूने, ती मालमत्ता सक्तीने ताब्यात घेईल तो वन अधिकारी किंवा पोलीस अधिकारी, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

**झाडांवरील व इमारती लाकडावरील निशाण्या नकली स्वरूपात करण्याबद्दल किंवा त्या विरूपित करण्याबद्दल आणि सीमाचिन्हे बदलण्याबद्दल शास्ती.**

६३. जी कोणतीही व्यक्ती, लोकांना किंवा कोणत्याही व्यक्तीला नुकसान पोचवण्याच्या किंवा इजा करण्याच्या अथवा " भारतीय दंड संहिता, १८६० " (सन १८६० चा ४५) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे गैरकमाई करण्याच्या हेतूने,—

(क) कोणतेही इमारती लाकूड किंवा असे उभे झाड ही, शासनाची किंवा एखाद्या व्यक्तीची मालमत्ता आहे किंवा ते एखाद्या व्यक्तीला कायदेशीररीत्या तोडता किंवा हलवता येईल हे दर्शविण्यासाठी वन अधिकारी वापरतात तशाच प्रकारची नकली निशाणी हेतुपुरस्सर अशा इमारती लाकडावर किंवा झाडावर लावील ; किंवा

(ख) वन अधिकाऱ्याने किंवा त्याच्या प्राधिकारान्वये एखाद्या झाडावर किंवा इमारती लाकडावर लावलेल्या अशा कोणत्याही निशाणीमध्ये फेरबदल करील, ती विरूपित करील किंवा पुसून टाकील ; किंवा

(ग) ज्यांना या अधिनियमाच्या तरतुदी लागू केलेल्या आहेत अशा कोणत्याही वनाच्या किंवा पडीत जमिनीच्या कोणत्याही सीमा-चिन्हामध्ये फेरबदल करील, ते चिन्ह काढून टाकील, नष्ट करील किंवा विरूपित करील,

अशी व्यक्ती, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या, किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**वॉरंटशिवाय अटक करण्याचे अधिकार.**

६४. (१) जी कोणतीही व्यक्ती, एक महिन्याच्या किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल अशा कोणत्याही वनविषयक अपराधामध्ये गुंतलेली आहे असा वाजवी संशय असेल अशा व्यक्तीला, कोणताही वन अधिकारी, किंवा पोलीस अधिकारी, दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय आणि वॉरंटशिवाय अटक करू शकेल.

(२) या कलमान्वये अटक करणारा प्रत्येक अधिकारी कोणत्याही प्रकारचा अनावश्यक विलंब न लावता आणि बंधपत्रावर मुक्तता करण्यासंबंधी या अधिनियमात असलेल्या तरतुदींच्या अधीन राहून, अटक केलेल्या व्यक्तीला त्या प्रकरणी अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे घेऊन जाईल किंवा सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे पाठवील.

(३) अशा कृतीला, कलम ३० च्या खंड (ग) अन्वये मनाई करण्यात आलेली नसेल तर, प्रकरण चार नुसार अपराध ठरणाऱ्या कोणत्याही कृतीबद्दल या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशी अटक करण्याचा प्राधिकार मिळतो असे मानले जाणार नाही.

**६५.** वनक्षेत्रपालाच्या दर्जापेक्षा कनिष्ठ दर्जाचा नसेल असा कोणताही वन अधिकारी किंवा त्यास दुय्यम असलेला अधिकारी, यांपैकी कोणीही, कलम ६४ च्या तरतुदींन्वये एखाद्या व्यक्तीला अटक केली तर, त्या व्यक्तीने, त्या प्रकरणात अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्यासमक्ष किंवा सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यासमक्ष जर आणि जेव्हा उपस्थित राहण्यास फर्मावले असेल, तेव्हा आपण उपस्थित राहू असे बंधपत्र लिहून दिले तर, उपरोक्त अधिकारी किंवा त्यास दुय्यम असलेला अधिकारी यांना अशा व्यक्तीची मुक्तता करता येईल. **अटक केलेल्या व्यक्तीला बंधपत्रावर मुक्त करण्याचा अधिकार.**

**६६.** प्रत्येक वन अधिकारी आणि पोलीस अधिकारी, कोणताही वनविषयक अपराध घडण्यास प्रतिबंध करील आणि अशा प्रकारे प्रतिबंध करण्यासाठी हस्तक्षेप करू शकेल. **अपराधांना प्रतिबंध करण्याचे अधिकार.**

**६७.** जिल्हा दंडाधिकारी किंवा राज्य शासनाने यासंबंधात विशेषेकरून अधिकार प्रदान केलेला कोणताही प्रथम वर्ग दंडाधिकारी, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या, किंवा पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल अशा कोणत्याही वनविषयक अपराधाबाबत "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८" (१८९८ चा ५) या अन्वये संक्षिप्तरीत्या न्यायचौकशी करू शकेल. **अपराधांची संक्षिप्तरित्या न्याय-चौकशी करण्याचे अधिकार.**

**६८.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वन अधिकाऱ्याला,— **अपराध आपसात मिटवण्याचे अधिकार.**

(क) ज्या कोणत्याही व्यक्तीने कलम ६२ किंवा कलम ६३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाव्यतिरिक्त अन्य कोणताही अपराध केला आहे असा तिच्याविरुद्ध वाजवी संशय असेल अशा व्यक्तीकडून, तिने जो अपराध केला असावा असा संशय आहे त्या अपराधाबद्दल भरपाईच्या स्वरूपात कोणतीही पैशांची रक्कम स्वीकारण्यासाठी ; आणि

(ख) एखादी मालमत्ता सरकारजमा होण्यास पात्र आहे या सबबीखाली जेव्हा ती सक्तीने ताब्यात घेण्यात आलेली असेल तेव्हा, अशा अधिकाऱ्याने ठरवलेले तिचे मूल्य भरण्यात आल्यावर ती मालमत्ता मुक्त करण्यासाठी, अधिकार प्रदान करू शकेल.

(२) अशा अधिकाऱ्याला, यथास्थिति, अशी रक्कम किंवा, मूल्य, किंवा, दोन्ही, प्रदान केल्यावर संशयित व्यक्ती ताब्यात असेल तर तिला सोडून देण्यात येईल, कोणतीही मालमत्ता ताब्यात घेतली असेल तर, ती बंधमुक्त करण्यात येईल आणि अशा व्यक्तीविरुद्ध किंवा मालमत्तेविरुद्ध त्यापुढची अन्य कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

(३) वन अधिकारी हा वन क्षेत्रपालाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नाही आणि त्याला दरमहा किमान शंभर रुपये पगार मिळत आहे असे असल्याशिवाय, कोणत्याही वन अधिकाऱ्याला या कलमान्वये कोणताही अधिकार प्रदान करण्यात येणार नाही आणि कोणत्याही परिस्थितीत पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये भरपाई म्हणून स्वीकारलेली रक्कम पन्नास रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

**६९.** या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये, किंवा या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही कृतीच्या परिणामी, एखादे वनोत्पादन ही शासनाची मालमत्ता आहे किंवा कसे याबद्दल प्रश्न उपस्थित होईल तेव्हा, विरुद्ध शाबीत होईपर्यंत, असे वनोत्पादन ही शासनाची मालमत्ता आहे असे गृहित धरण्यात येईल. **वनोत्पादन हे शासनाच्या मालकीचे आहे असे गृहित धरणे.**

## प्रकरण दहा

## गुराढोरांचे अतिक्रमण

**७०.** ज्या ठिकाणी गुरे चारण्यास कायदेशीररित्या बंदी घालण्यात आलेली आहे अशा राखीव वनात किंवा संरक्षित वनाच्या कोणत्याही भागात गुरांचे अतिक्रमण झाल्यास, अशा गुरांना "गुरे अतिक्रमण अधिनियम, १८७१" (१८७१ चा १) याच्या कलम ११ च्या अर्थांतर्गत सरकारी मळ्यांचे नुकसान करणारी गुरे म्हणून मानण्यात येईल आणि कोणताही वन अधिकारी किंवा पोलीस अधिकारी ती सक्तीने ताब्यात घेऊन, त्यांना कोंडवाड्यात ठेवू शकेल. **गुरे अतिक्रमण अधिनियम, १८७१ हा लागू असणे.**

**७१.** राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, या अधिनियमाच्या कलम ७० अन्वये कोंडवाड्यात कोंडलेल्या प्रत्येक गुराच्या संबंधात गुरे अतिक्रमण अधिनियम, १८७१ (१८७१ चा १) याच्या कलम १२ अन्वये निश्चित केलेल्या द्रव्यदंडाऐवजी शासनाला योग्य वाटेल असा द्रव्यदंड दरडोई आकारू शकेल. मात्र, हा द्रव्यदंड खाली दिलेल्या मर्यादांपेक्षा अधिक असणार नाही, तो म्हणजे :— **त्या अधिनियमान्वये निश्चित केलेले द्रव्यदंड बदलण्याचे अधिकार.**

| | |
|---|---|
| प्रत्येक हत्तीमागे | दहा रुपये |
| प्रत्येक म्हशीमागे किंवा उंटामागे | दोन रुपये |
| प्रत्येक घोडा, घोडी, खच्ची केलेले घोडे, तट्टू, शिंगरू, शिंगी, खेचर, सांड, बैल गाय किंवा कालवड यांच्यामागे. | एक रुपया |
| प्रत्येक वासरू, गाढव, डुक्कर, एडका, मेंढी, बकरी, कोकरू, बोकड किंवा करडू यांच्या मागे. | आठ आणे |

प्रकरण अकरा

## वन अधिकाऱ्यांबाबत

**राज्य शासन वन अधिकाऱ्यांकडे विशिष्ट अधिकार विनिहित करू शकेल.**

**७२.** (१) राज्य शासन कोणत्याही वन अधिकाऱ्याकडे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकार विनिहित करू शकेल, ते असे,—

(क) कोणत्याही जमिनीवर प्रवेश करून तिची पाहणी व तिचे सीमांकन करण्याचा आणि तिचा नकाशा तयार करण्याचा अधिकार ;

(ख) साक्षीदारांना उपस्थित राहण्यास भाग पाडण्याचा आणि दस्तऐवज व भौतिक वस्तू हजर करवण्याचा दिवाणी न्यायालयाचा अधिकार ;

(ग) फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) या अन्वये झडती वॉरंट काढण्याचा अधिकार ; आणि

(घ) वनविषयक अपराधांची चौकशी करण्याचा आणि, अशा चौकशीच्या दरम्यान पुरावा घेण्याचा आणि तो नोंदवण्याचा अधिकार.

(२) पोटकलम (१) च्या खंड (घ) खाली नोंदवण्यात आलेला कोणताही पुरावा, एखाद्या दंडाधिकाऱ्यापुढे मागाहून होणाऱ्या कोणत्याही न्यायचौकशीत ग्राह्य ठरेल, मात्र, तो पुरावा आरोपी व्यक्तीच्या समक्ष घेण्यात आलेला असला पाहिजे.

**वन अधिकाऱ्यांना लोकसेवक मानावे.**

**७३.** सर्व वन अधिकारी हे, भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५) याच्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**सद्भावनेने केलेल्या कृतीला संरक्षण.**

**७४.** या अधिनियमान्वये कोणत्याही लोकसेवकाने सद्भावपूर्वक केलेल्या कोणत्याही कृतीबद्दल त्याच्याविरुद्ध कोणताही दावा दाखल केला जाणार नाही.

**वन अधिकाऱ्यांनी व्यापार न करणे.**

**७५.** राज्य शासनाच्या लेखी परवानगीशिवाय कोणत्याही वन अधिकाऱ्याला, प्रकर्ता म्हणून किंवा एजंट म्हणून इमारती लाकडाचा किंवा अन्य वनोत्पादनाचा व्यापार करता येणार नाही किंवा कोणत्याही वनाच्या कोणत्याही पट्ट्यामध्ये किंवा कोणत्याही वनाच्या कामासंबंधीच्या कोणत्याही कंत्राटामध्ये हितसंबंधित राहता किंवा होता येणार नाही,—मग ते वन [१][हा अधिनियम लागू होणाऱ्या क्षेत्राच्या] आत असो अगर बाहेर असो.

प्रकरण बारा

## गौण नियम

**नियम करण्याचे जादा अधिकार.**

**७६.** राज्य शासन, पुढील गोष्टींसाठी नियम करू शकेल,—

(क) या अधिनियमान्वये कोणत्याही वन अधिकाऱ्याचे अधिकार आणि कर्तव्ये विहित करणे व मर्यादित करणे ;

(ख) या अधिनियमान्वये द्रव्यदंडाच्या आणि सरकारजमा केलेल्या मालमत्तेच्या उत्पन्नामधून अधिकाऱ्यांना आणि खबऱ्यांना देण्यात येणाऱ्या बक्षिसांचे नियमन करणे ;

(ग) शासनाच्या मालकीची परंतु, खाजगी व्यक्तीच्या मालकीच्या किंवा ताब्यात असलेल्या जमिनीवर वाढलेली झाडे आणि इमारती लाकूड जतन करणे, त्यांचे पुनरुत्पादन करणे किंवा त्यांची विल्हेवाट लावणे ; आणि

(घ) सर्वसाधारणपणे, या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करणे.

**नियमांच्या उल्लंघनाबद्दल शास्ती.**

**७७.** ज्या नियमांच्या उल्लंघनाबद्दल कोणत्याही विशेष शास्तीची तरतूद करण्यात आलेली नाही अशा, या अधिनियमाखालील कोणत्याही नियमांचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**नियम कायद्याप्रमाणे केव्हा अंमलात येतील.**

**७८.** या अधिनियमाअन्वये राज्य शासनाने केलेले सर्व नियम, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील, आणि त्यानंतर ते शक्य असतील तेथवर या अधिनियमांशी सुसंगत असतील तेवढ्या मर्यादेपर्यंत, ते जणू काही त्या अधिनियमात अंतर्भूत असावेत त्याप्रमाणे अंमलात येतील.

---

१. विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६ द्वारे " भाग क राज्यांच्या आणि भाग ग राज्यांच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण तेरा

## संकीर्ण

**वन अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांना साहाय्य करण्यास बद्ध असलेल्या व्यक्ती.**

**७९.** (१) एखाद्या राखीव किंवा संरक्षित वनात जी व्यक्ती कोणताही अधिकार वापरते किंवा जिला अशा वनातून कोणतेही वनोत्पादन घेण्याची, किंवा इमारती लाकूड काषण्यांची आणि ते घेऊन जाण्याची किंवा तेथे गुरांना चराईसाठी नेण्याची परवानगी देण्यात आलेली आहे अशा प्रत्येक व्यक्तीने आणि अशा कोणत्याही व्यक्तीने अशा वनात कामावर ठेवलेली असेल त्या प्रत्येक व्यक्तीने, आणि

अशा वनाच्या आसपासच्या गावात शासनाने नियुक्त केलेल्या किंवा समाजाला सेवा उपलब्ध करून देण्याबद्दल जिला शासनाकडून वित्तलब्धी मिळतात अशा प्रत्येक व्यक्तीने कोणताही वनविषयक अपराध घडल्यासंबंधी किंवा तो करण्याचा कोणाचा हेतू असल्यासंबंधी तिच्याकडे जी कोणतीही माहिती असेल ती माहिती, त्या व्यक्तीने विनाविलंब सर्वात जवळच्या वन अधिकाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याला कळवणे बंधनकारक असेल व त्या व्यक्तीने,—

(क) कोणत्याही वनात वणवा लागल्याचे तिला माहीत असेल किंवा तशी माहिती मिळाली असेल तर, अशी कोणतीही आग विझविण्याकरिता ;

(ख) अशा वनाच्या जवळपास कोणतीही आग लागल्याचे तिला माहीत असेल किंवा तशी माहिती मिळाली असेल तर, ती अशा वनापर्यंत पसरू नये म्हणून आपल्या अखत्यारीतील कोणत्याही वैध मार्गांनी प्रतिबंध करण्याकरिता ;

तात्काळ उपाययोजना केली पाहिजे ; मग कोणत्याही वन अधिकाऱ्याने किंवा पोलीस अधिकाऱ्याने तसे फर्मावलेले असो अगर नसो ;

आणि तिच्या साहाय्याची मागणी करणाऱ्या वन अधिकाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याला,—

(ग) अशा वनामध्ये कोणताही वनविषयक अपराध घडण्यास प्रतिबंध करण्याच्या कामी ; आणि

(घ) अशा वनात असा कोणताही अपराध घडला आहे असे वाटण्यास कारण असेल तेव्हा, अपराध्याला हुडकून काढण्याच्या व अटक करण्याच्या कामी ;

साहाय्य दिले पाहिजे.

(२) उपरोक्त गोष्टी करणे जिला भाग आहे अशी कोणतीही व्यक्ती, कायदेशीर सबबीशिवाय (हे सिद्ध करण्याचा बोजा अशा व्यक्तीवर असेल),—

(क) पोटकलम (१) अनुसार आवश्यक असलेली कोणतीही माहिती निष्कारण विलंब न लावता सर्वांत जवळच्या वन अधिकाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याला कळवण्यास ;

(ख) कोणत्याही राखीव किंवा संरक्षित वनातील वणवा विझविण्याकरिता पोटकलम (१) अनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यास ;

(ग) अशा वनाच्या आसपास लागलेली कोणतीही आग वनापर्यंत पसरू नये म्हणून पोटकलम (१) अनुसार प्रतिबंध उपाययोजना करण्यास ; किंवा

(घ) अशा वनामध्ये कोणताही वनविषयक अपराध घडण्यास प्रतिबंध करण्याच्या कामी किंवा असा कोणताही अपराध घडला आहे असे वाटण्यास कारण असेल तेव्हा अपराध्याला हुडकून त्याला अटक करण्याच्या कामी साहाय्य मागणाऱ्या कोणत्याही वन अधिकाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याला साहाय्य करण्यात,

कसूर करील तर, ती व्यक्ती एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या, किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**शासन आणि अन्य व्यक्ती यांच्या सामाईक मालकीच्या वनांची व्यवस्था.**

**८०.** (१) जर शासन आणि कोणतीही व्यक्ती यांचे एखाद्या वनात किंवा पडीत जमिनीमध्ये किंवा त्याच्या संपूर्ण वनोत्पादनात किंवा त्यातील कोणत्याही भागात सामाईक हितसंबंध असतील तर, राज्य शासन एकतर,—

(क) अशा वनात, पडीत जमिनीत किंवा वनोत्पादनात अशा व्यक्तीचा जो हितसंबंध असेल तेवढ्यापुरते उत्तरदायी राहून, अशा वनांची किंवा पडीत जमिनीची व्यवस्था पाहण्याचे काम स्वतःकडे घेऊ शकेल ; किंवा

(ख) अशा प्रकारे सामाईक हितसंबंध असलेल्या व्यक्तीकडून असे वन, पडीत जमीन किंवा वनोत्पादन यांची व्यवस्था पाहण्याकरिता आणि त्यात हितसंबंध असणाऱ्या त्यातील सर्व पक्षांच्या हिताच्या दृष्टीने स्वतःला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, विनियम करू शकेल ;

(२) पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये राज्य शासन जेव्हा कोणत्याही वनाची, पडीत जमिनीची किंवा वनोत्पादनाची व्यवस्था आपल्या हाती घेईल तेव्हा, असे वन, पडीत जमीन किंवा वनोत्पादन यांना दुसऱ्या आणि चौथ्या प्रकरणामध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही तरतुदी लागू होतील असे राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे घोषित करू शकेल, आणि त्यानंतर अशा तरतुदी लागू होतील.

**ज्या सेवेबद्दल सरकारी वनातील उत्पादनाचा हिस्सा घेण्यात येतो ती सेवा बजावण्यात कसूर करणे.**

८१. जे वन शासनाच्या मालकीचे आहे किंवा ज्यावर शासनाला मालकी स्वरूपाचे अधिकार आहेत अशा कोणत्याही वनापासून मिळणाऱ्या उत्पादनापैकी एखाद्या हिश्श्यास अथवा ज्या वनोत्पादनास शासन हक्कदार आहे अशा त्यापैकी कोणत्याही भागास जर कोणी व्यक्ती अशा वनाशी संबंधित अशी कोणतीही सेवा योग्यप्रकारे बजावण्याच्या शर्तीवर हक्कदार असेल तेव्हा, अशी सेवा आता बजावण्यात येत नाही ही गोष्ट राज्य शासनाची खात्री पटेल अशा प्रकारे शाबीत झाल्यास, असा हिस्सा सरकारजमा होण्यास पात्र ठरेल :

परंतु असे की, अशा हिश्श्यास किंवा भागास हक्कदार असलेल्या व्यक्तीचे म्हणणे आणि योग्य प्रकारे सेवा बजावल्याबद्दल तिने जर कोणताही पुरावा सादर केला तर तो पुरावा, या दोन्ही गोष्टी राज्य शासनाने या संबंधात रीतसर नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने ऐकून घेतल्याखेरीज असा कोणताही हिस्सा सरकारजमा केला जाणार नाही.

**शासनाला येणे असलेल्या रकमेची वसुली.**

८२. या अधिनियमान्वये, किंवा या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमान्वये, किंवा कोणत्याही वनोत्पादनाच्या किंमतीदाखल अगर अशा वनोत्पादनाच्या संबंधात या अधिनियमाची अंमलबजावणी करताना आलेल्या खर्चापोटी शासनाला येणे असलेली सगळी रक्कम देय असेल तेव्हा देण्यात आली नाही तर, ती जणू काही जमीन-महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये वसूल करता येईल.

**अशा पैशाकरिता वनोत्पादनावर धारणाधिकार.**

८३. (१) जेव्हा कोणत्याही वनोत्पादनाकरिता किंवा त्याच्या संबंधात काही पैसे देय असतील तेव्हा, ती रक्कम अशा उत्पादनावरील प्रथम प्रभार म्हणून समजली जाईल, आणि अशी रक्कम भरण्यात येईपर्यंत, असे वनोत्पादन वन अधिकाऱ्याला आपल्या ताब्यात घेता येईल.

(२) अशी रक्कम देय असेल तेव्हा ती भरण्यात आली नाही तर, वन अधिकारी असे वनोत्पादन जाहीर लिलावाद्वारे विकू शकेल, आणि अशा विक्रीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा प्रथम अशी रक्कम चुकती करण्यासाठी विनियोग करण्यात येईल.

(३) यापैकी काही रक्कम शिल्लक राहिल्यास व त्या रकमेला हक्कदार असलेल्या व्यक्तीने विक्रीच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत त्या रकमेबद्दल मागणी न केल्यास, ती रक्कम शासनाकडे समपहृत केली जाईल.

**या अधिनियमान्वये आवश्यक ठरलेली जमीन "भूमि संपादन अधिनियम, १८९४" अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ आवश्यक आहे असे मानण्यात येईल.**

८४. एखादी जमीन या अधिनियमातील कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक आहे असे जेव्हा जेव्हा राज्य शासनाला वाटेल तेव्हा तेव्हा, अशी जमीन भूमि संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा १) याच्या कलम ४ च्या अर्थांतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ आवश्यक आहे असे मानण्यात येईल.

**बंधपत्रान्वये येणे असलेली शास्तीची रक्कम वसूल करणे.**

**८५.** जेव्हा कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींनुसार किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या अनुपालनार्थ कोणत्याही बंधपत्राद्वारे किंवा संलेखाद्वारे स्वत:ला, कोणतेही कर्तव्य किंवा कार्य पार पाडण्यासाठी बांधून घेईल, किंवा ती व्यक्ती अगर ती स्वतः व तिचे कर्मचारी व एजंट एखादी कृती करण्यापासून परावृत्त राहतील असे कोणत्याही बंधपत्राद्वारे किंवा संलेखाद्वारे कबूल करील तेव्हा, अशा बंधपत्राच्या किंवा संलेखाच्या शर्तीचा भंग झाल्यास भरावयाची रक्कम म्हणून त्यात नमूद केलेली संपूर्ण रक्कम, भारतीय संविदा अधिनियम, १८७२ (१८७२ चा ९) याच्या कलम ७४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, असा भंग झाला असता, ती जणू काही जमीन महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे त्या व्यक्तीकडून वसूल करता येईल.

**केंद्र शासनाच्या अधिकारांची व्यावृत्ती.**

[१][**८५क.** या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही राज्य शासनाला, त्या राज्याकडे निहित नसलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या संबंधात कोणताही आदेश देण्याचा अगर त्याबाबतीत कोणतीही गोष्ट करण्याचा किंवा केंद्र सरकारच्या किंवा अन्य कोणत्याही राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकारांना अन्य प्रकारे बाध येईल असे कोणतेही कृत्य संबंधित शासनाच्या संमतीशिवाय करण्याचा प्राधिकार मिळतो असे मानता येणार नाही.]

**निरसने.**

**८६.** निरसन व सुधारणा अधिनियम, १९४८ (१९४८ चा २) याचे कलम २ आणि अनुसूची याद्वारे निरसित.

**अनुसूची** निरसन व सुधारणा अधिनियम, १९४८ [(१९४८ चा २) याचे कलम २ आणि अनुसूची याद्वारे निरसित]

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे हे कलम मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले. मूळ कलम हे भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे दाखल करण्यात आले होते.